

# मैत्री हॉलिडेज

- भूनंदनवन काश्मीर - वैष्णोदेवी (दि. १५ मे आणि २९ मे २०२३ - ११ दिवस) खर्च प्रति व्यक्ती : रु. १७,०००/+ रेल्वे तिकीट
- सिमला कुल्लू- . मनाली - चंदिगढ (दि. १० मे आणि २० मे २०२३ - ९ दिवस) खर्च प्रति व्यक्ती : रु. १६,०००/+ रेल्वे तिकीट
- चारधाम यात्रा ( गंगोत्री-यमुनोत्री - केदारनाथ - बद्रीनाथ ) ( दि. १० जून २०२३ ) खर्च प्रति व्यक्ती : रु. २३,५००/ + रेल्वे तिकीट
- केदारनाथ - बद्रीनाथ यात्रा ( दि. १० जून २०२३ ) खर्च प्रति व्यक्ती : रु. १६,५००/ + रेल्वे तिकीट
- केदारनाथ यात्रा (दि. १० जून २०२३) खर्च प्रति व्यक्ती : रु. ११,५००/ + रेल्वे तिकीट
- श्री काशी-गया-प्रयाग-चित्रकूट-भुवनेश्वर-जगन्नाथपुरी-कोणार्क-कोलकाता-गंगासागर (दि. २ एप्रिल २०२३ - कालावधी - १४ दिवस) खर्च प्रति व्यक्ती - रु. १५,०००/- (बस यात्रा)

पत्ता : लोटस पॅलेस, सेक्टर- २ ए, प्लॉट न. ८९, करंजाडे - पनवेल

संपर्क - ८४४६५११९२५, ९९६११३२७५७



गुरुवार, १६ फेब्रुवारी २०२३

# राम प्रहर

◆ वर्ष १५ ◆ अंक २०९
www.ramprahar.com

◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड


## अंतरंग


केंद्रीय गृहमंत्री अमित शाह पुणे, कोल्हापूर दौऱ्यावर/२

माथेरान मिनीट्रेनचे इंजिन आले रुळावरून खाली/५

टीम इंडियाने रचला इतिहास! तिन्ही प्रकारांत अव्वल/८




# अभिमानास्पद! लाल किल्ल्यात साजरी होणार शिवजयंती

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आग्रा येथील लाल किल्ल्यात शिवजयंती साजरी करण्यास पुरातत्त्व खात्याने परवानगी दिली आहे. किल्ल्यातील 'दिवाण-ए-आम'मध्ये शिवजयंती साजरी करण्यात येणार असल्याची माहिती महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. त्यामुळे शिवप्रेमींनी आनंद व्यक्त केला आहे.

विनोद पाटील यांचे अजिंक्य देवगिरी फाउंडेशन आणि महाराष्ट्र सरकारकडून लाल किल्ल्यामध्ये यंदा शिवजयंती साजरी करण्यात येणार आहे. या सोहळ्याला उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

सुमारे साडेतीनशे वर्षांपूर्वी औरंगजेबने छत्रपती शिवाजी महाराज आणि युवराज संभाजी यांना आग्र्यात नजरकैदेत ठेवले होते. या दोघांनाही त्या ठिकाणी मारण्याचा कट औरंगजेबने आखला होता, पण शिवरायांनी मोठ्या शिताफीने आग्र्यातून सुखरूप सुटका करून घेतली. या घटनेला इतिहासात अनन्यसाधारण महत्त्व आहे.


# दहावी-बारावीच्या परीक्षार्थींना दिलासा

## १० मिनिटांचा वाढीव वेळ मिळणार

**पुणे : प्रतिनिधी**

राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या दहावी आणि बारावीच्या परीक्षेत विद्यार्थ्यांना १० मिनिटांचा वाढीव वेळ दिला जाणार आहे. शासनाच्या निर्देशानुसार शिक्षण मंडळाने वेळ वाढविण्याचा निर्णय घेतला आहे.

कोरोना काळात दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना अधिकचा वेळ, शाळेतच परीक्षा केंद्र अशा सुविधा देण्यात आल्या होत्या. यंदा कोरोना पूर्व काळानुसार परीक्षा घेतल्या जाणार असल्याने राज्य मंडळाने गेल्या वर्षीच्या सवलती रद्द केल्या. कॉपीमुक्त अभियानांतर्गत परीक्षेदरम्यान होणारे गैरप्रकार रोखण्यासाठी परीक्षेच्या वेळेपूर्वी



प्रश्नपत्रिकेचे आकलन होण्यासाठी दिली जाणारी १० मिनिटे रद्द करण्याचा निर्णय राज्य मंडळाने घेतला तसेच परीक्षा केंद्रावर पूर्णवेळ बैठे पथक, विद्यार्थ्यांची झडती आदी उपाययोजनाही करण्यात आल्या आहेत. परीक्षेच्या वेळेपूर्वीची १० मिनिटे रद्द करण्याच्या राज्य मंडळाच्या निर्णयानंतर नाराजीचा सूर उमटला होता. त्यानंतर आता वाढीव १० मिनिटे देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

राज्य मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी म्हणाले, की १० मिनिटे रद्द करण्याच्या निर्णयानंतर पालक-विद्यार्थ्यांकडून शासनाला निवेदने देण्यात आली होती. त्यामुळे शासनाच्या निर्देशानुसार १० मिनिटे वाढवून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ही १० मिनिटे परीक्षेच्या निर्धारित वेळेनंतर वाढवून दिली जाणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.

**पनवेल : महाशिवरात्रीच्या पार्श्वभूमीवर उलवे नोड सेक्टर ३ येथील लांगेश्वर महादेव मंदिरात शिवशक्ती नवयुग मित्र मंडळ आणि राजस्थानी प्रवासी संघ उलवे नोडच्या वतीने माता पार्वती मूर्ती प्राणप्रतिष्ठापना सोहळा मंगळवारी आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यास माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देत शुभेच्छा दिल्या.** (वृत्त पान ३ वर..)




# अनिरुद्ध देशपांडे यांच्या मालमत्तांवर धाडी

**पुणे, धाटाव : प्रतिनिधी**



आयकर विभागाने बुधवारी (दि. १५) सिटी ग्रुपचे मालक अनिरुद्ध देशपांडे यांच्या पुण्यातील मालमत्तांवर धाड टाकल्यानंतर रायगड जिल्ह्यातदेखील धाड टाकली. रोह्यातील केळतवाडी फार्मवर ही धाड टाकण्यात आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

अनिरुद्ध देशपांडे यांच्याशी संबंधित मालमत्तांवर छापे टाकण्यात आले. देशपांडे यांच्या सिटी ग्रुपशी संबंधित आठ ठिकाणांवर छापे टाकले गेले. यात डेक्कन आणि मगरपट्ट्याजवळ ॲमनोरा येथील कार्यालयांचा समावेश आहे. प्राप्तीकर खात्याचे अधिकारी तेथे झाडाझडती घेत होते. देशपांडेंच्या रोहा तालुक्यातील फार्मवरही धाड टाकण्यात आली. जवळपास १४ वाहनांमधून आलेल्या आयकर विभागाच्या अधिकारी व पोलिसांनी ही कारवाई केली.


# लोकनेते दि. बा. पाटील यांचे कार्य क्यूआर कोडद्वारे होणार प्रसारित

## स्मारकातील उपक्रमासाठी माहिती पाठविण्याचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरात असलेल्या महापालिकेच्या लोकनेते दि. बा. पाटील विद्यालय प्रांगणात प्रकल्पग्रस्तांचे आधारवड दिवंगत दि. बा. पाटील यांचे पुतळा स्वरूपात स्मारक उभारण्यात येणार असून त्यांच्या जीवनावरील माहिती अद्ययावत प्रणाली असलेल्या क्यूआर कोडद्वारे प्रसारित केली जाणार आहे. त्या अनुषंगाने त्यांचे सोबती तसेच कार्यकर्त्यांनी लेखन स्वरूपात माहिती पाठविण्याचे आवाहन पनवेल-उरण आगरी समाज मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

लोकनेते दि. बा. पाटील यांनी भूमिपुत्र, प्रकल्पग्रस्त, कष्टकरी शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आपले आयुष्य वेचले आहे. नगराध्यक्ष, पाचवेळा आमदार, विरोधी पक्षनेते, दोन वेळा खासदार अशी दमदार कारकीर्द कामगिरी दि. बा. पाटील यांची राहिली आहे. आपल्या बुलंद आवाजाने महाराष्ट्र विधिमंडळात तसेच खासदार म्हणून दिल्लीच्या सार्वभौम संसदेत शेतकऱ्यांचे, कष्टकऱ्यांचे, प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न त्यांनी पोटतिडकीने मांडले. मंडल आयोगाच्या अंमलबजावणीसाठी आणि त्यानंतर ओबीसी समाजात जागृती करण्यासाठी त्यांनी सारा महाराष्ट्र पिंजून काढला. संयुक्त महाराष्ट्र चळवळ, सीमा प्रश्न अशा अनेक जनलढ्यात त्यांनी हिरीरीने भाग घेऊन तुरुंगवासही भोगला. त्यामुळे त्यांचे हे समाजहिताचे कार्य नव्या



पिढीला कायम स्मरणात रहावे यासाठी या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

लोकनेते दि. बा. पाटील यांची महती मोठी आहे. त्यांच्या कार्याचा प्रभाव फक्त पनवेल, उरण, रायगड, नवी मुंबई, मुंबईतच नाही; तर संपूर्ण महाराष्ट्र, देशपातळीवर आहे. त्याला अनुसरून लोकनेते दि. बा. पाटील यांच्यासोबत काम केलेले मान्यवर व कार्यकर्त्यांनी आपले अनुभव, आठवणी लेखन स्वरूपात तयार करून ५ मार्चपर्यंत पनवेल-उरण आगरी समाज मंडळाच्या पनवेल शहरात असलेल्या महात्मा फुले सभागृहात (आगरी समाज हॉल) जमा करायच्या आहेत. या सर्व लेखनाचे संकलन करून ते लोकनेते दि. बा. पाटील विद्यालयाच्या प्रांगणात उभारण्यात येणाऱ्या स्व. दि. बा. पाटील यांच्या स्मारकाच्या अनुषंगाने त्या ठिकाणी क्यूआर कोडच्या माध्यमातून प्रकाशित होणार आहे.




## निवडक

### अज्ञात त्रिकुटाने पळवली दुचाकी

**पनवेल :** रस्त्यावर मोटरसायकल उभी करून कंपनीच्या आत फक्त बॅग आणण्यासाठी गेलेल्या व्यक्तीची मोटरसायकल अज्ञात त्रिकुटाने पळवून नेल्याची घटना तळोजा एमआयडीसी येथे घडली आहे. याघटनेची नोंद तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. चिंचवली येथील अक्षय काडवले कामावरून घरी परत येत असताना त्यांनी फक्त बॅग घेण्यासाठी मोटरसायकल जगन्नाथ हॉटेलच्या मागील रस्त्यावर उभी केली होती. या वेळी अज्ञात तीन व्यक्तींनी त्याची २५ हजार रुपये किमतीची काळ्या रंगाची बजाज कंपनीची प्लसर (एचएच ४६ एएम १०५३) पळवून नेली. याबाबत अक्षयने तळोजा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

### विविध कार्यक्रमांसंदर्भात निवेदन



**पनवेल :** १९ फेब्रुवारीला शिवजयंती उत्सव आणि २७ फेब्रुवारीला मराठी भाषा दिनानिमित्त प्रत्येक शाळा आणि महाविद्यालयात विविध कार्यक्रम आयोजित करण्यासंदर्भात मनसे विद्यार्थी सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी पनवेलचे शिक्षणाधिकारी सिताराम मोहिते यांना निवेदन दिले आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त तसेच मराठी भाषा दिनानिमित्त प्रत्येक शाळेत व महाविद्यालयात विविध कार्यक्रम आयोजित करण्याबाबत आणि महाराष्ट्र सरकारमार्फत नव्याने घोषित झालेल्या जय जय महाराष्ट्र माझा या राज्य गीताची धून या दोन्ही दिवशी तसेच दररोज वाजवली जावी, अशी मागणी पनवेलच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे निवेदनद्वारे करण्यात आली आहे. यानुसार शिक्षणाधिकाऱ्यांनी सर्व शाळामधील मुख्याध्यापकांना या विषयासंदर्भात सूचना दिल्या. अनिमेष ओझे, अॅड. अक्षय जोशी, सागर गायकवाड, आकाश गाडे, अमर पाटील, प्रथमेश देवनाळे आदी निवेदन देतेवेळी उपस्थित होते.

# अनोळखी महिलेच्या हत्येचा छडा; आरोपी अटकेत

## गुन्हे शाखा मध्यवर्ती कक्षाची कामगिरी



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल-सायन मार्गावरील कोपरखैरणे येथील खाडीलगतच्या झाडाझुडपामध्ये अनोळखी महिला मृतदेह आढळला होता. या महिलेची हत्या करण्यात आली होती. या प्रकरणाचा छडा लावण्यात गुन्हे शाखा मध्यवर्ती कक्षाला यश आले आहे. या हत्येतील आरोपीला ४८ तासांच्या आत गुन्हे शाखा मध्यवर्ती कक्षाने अटक केली आहे.

कोपरखैरणे येथील कांचनगंगा सोसायटीच्या विरुद्ध बाजूस असलेल्या नाल्यालगत खाडीकडे जाणाऱ्या अरुंद रोडच्या डाव्याबाजुच्या झाडाझुडपामध्ये ३५ ते ४० वर्ष वयाच्या अनोळखी महिलेची अज्ञात व्यक्तीने तिचा गळा आवळून खून केला तसेच पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने तिचा मृतदेह खाडीमध्ये टाकून दिला होता.


या गुन्ह्याचा तपास मध्यवर्ती कक्ष गुन्हे शाखेचे निरीक्षक विश्वनाथ कोळेकर, पोलीस उपनिरीक्षक प्रताप देसाई, हवालदार आतिश कदम, सतिश सरफरे, महेश पाटील, अनिल यादव आदींच्या पथकाने या प्रकरणातील आरोपीचा शोध घेतला आहे. चौकशीदरम्यान त्यांना ही महिला सफाई कामगार असून तिचे नाव सायरा बानु हासमी आहे व ती मानखुर्द येथे वास्तव्यास असल्याचे माहित पडले.

तांत्रिक तपास व गुप्त माहितीदारामार्फत पोलिसांनी राजकुमार पाल (वय ४० वर्ष, धंदा वॉचमन) याला शिताफिने ताब्यात घेतले. त्याने सायरा हिने लग्नाचा तगादा लावल्याने तिला कोपरखैरणे येथील कांचनगंगा सोसायटीच्या समोरील नाल्यालगत, खाडीकडे जाणाऱ्या अरुंद रोडच्या डाव्या बाजूला, झाडाझुडपामध्ये बोलावून ठार मारल्याचे कबूल केले.

कोणताही पुरावा नसताना गुन्हे शाखा मध्यवर्ती कक्षाने फक्त तांत्रिक तपास आणि गुप्त बातमीदाराच्या सहाय्याने फक्त ४८ तासांत हा गुंता सोडवला आहे.

# कामोठे वसाहतीमध्ये पाईप गॅसच्या कामादरम्यान स्फोट

## दोन कामगारांसह घरातील सदस्य जखमी





**पनवेल : वार्ताहर**

कामोठे सेक्टर ६मधील दुधे कॉर्नर सोसायटीमध्ये महानगर गॅसचे कामकाज सुरू असताना गॅस पाईप लाईनमध्ये स्फोट झाल्याची घटना कामोठे वसाहतीमध्ये घडल्याचे उघड झाले आहे. या घटनेत दोन कामगार आगीत होरपळले आहेत तसेच घरात असलेले इतर सदस्य किरकोळ जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी कामोठे येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

कामोठे सेक्टर अ मधील दुधे कॉर्नर सोसायटीमध्ये ही घटना मंगळवारी (दि. १४) रात्रीच्या सुमारास घडली आहे. या सोसायटीमध्ये महानगर गॅस पाईप लाईनच्या कनेक्शनचे काम सुरू होते. सोसायटीमधील सी विग रूम नंबर १२मधील रहिवाशी त्रिंबक जाधव यांच्या घरात हे कनेक्शनचे काम सुरू होते. या वेळी घरात पाच सदस्य आणि दोन कामगार होते. गॅस पाईपचे कनेक्शन करताना गॅसचा मेन कॉक चालू होता. गॅसचा सप्लायदेखील सुरू होता. या वेळी घरातील पाईपचा कॉक सुरू असून गॅस लिकेज होत होता. कामकाज सुरू असताना गॅस कामगारांनी शोल्डरीगचे काम सुरू केले याचवेळी लिकेज असलेल्या पाईपने आग पकडली आणि मोठा स्फोट झाला.

या आवाजाने इमारतीमधील इतर रहिवाशियाची पळापळ सुरू झाली. हा स्फोट एवढा भयानक होता की, घरातील इतर समान आणि कामगारांना आग लागली नशीब बलवत्तर म्हणून दोन्ही कामगार हे किरकोळ होरपळले आहेत. एक कामगार किरकोळ जखमी झाला आहे तर दुसरा कामगार होरपळला असून त्याच्या हाताला आणि छातीला आग लागून तो जखमी झाला आहे. ही आगीची घटना कामोठे पोलीस आणि अग्निशमन दलाच्या जवानांना मिळाल्यानंतर अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी पोचून गॅस सप्लाय बंद केला, आणि पोलिसांनी तत्काळ जखमी कामगारांना कामोठे वसाहतीमधील रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे.

# मोबाईलसाठी जीवघेणा हल्ला करणाऱ्यास अटक

**पनवेल : वार्ताहर**

रेल्वेस्थानक परिसरात मोबाईलवर बोलत उभ्या असलेल्या लोको पायलटवर गर्दुल्ल्यांकडून मोबाईल चोरीसाठी जीवघेणा हल्ला केल्याची घटना घडली होती. या प्रकरणी एकाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

अजनीकुमार रमाशंकर बिंद (वय ३०) हे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसमध्ये लोको पायलट मॅनेजर म्हणून काम करतात. पनवेल रेल्वे स्थानकात ते ड्युटीवर होते. रात्री जेवण झाल्यानंतर साडेदहाच्या सुमारास प्लॅटफॉर्म क्रमांक १ येथे पोलीस चौकीबाहेर फोनवर बोलत उभे होते. नशेत असलेल्या चोरट्याने लोकोपायलट बिंद यांच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. तोंडावर नाकावर जोरदार ठोसे मारले. बिंद यांनी आरडाओरड केल्यामुळे ड्युटीवर असलेले लोहमार्ग पोलीस, आरपीएफ पोलीस धावून गेले.

इजाज सलिम शेख (वय २३) असे हल्लेखोराचे नाव आहे. स्थानकाजवळील नवनाथनगर झोपडपट्टीत तो राहतो. पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले असून मोबाइलचोरी करून चोरीसाठी जबरी मारहाण केल्याप्रकरणी पनवेल लोहमार्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. बिंद यांना जबर मारहाण झाल्यामुळे प्राथमिक उपचारानंतर खांदा कॉलनीतील अष्टविनायक हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. झटापटीत झुडपांमध्ये फेकून दिलेला १५ हजार रुपये किमतीचा मोबाईल सापडला आहे.

# कळंबोलीत आज मोफत नेत्र चिकित्सा व चष्मे वाटप शिबिर



**पनवेल : वार्ताहर**

मावळ लोकसभा मतदारसंघातील बाळासाहेबांची शिवसेनेचे लोकप्रिय खासदार श्रीरंग उर्फ आप्पा बारणे यांच्या वाढदिवसानिमित्त बाळासाहेबांची शिवसेनेचे रायगड जिल्हा संपर्कप्रमुख रामदास शेवाळे यांच्या मार्फत मोफत नेत्र चिकित्सा व मोफत चष्मे वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

गुरुवारी (दि. १६) सकाळी १० ते दुपारी २च्या दरम्यान बाळासाहेबांची शिवसेनेच्या कळंबोली सेक्टर ३ई येथील मध्यवर्ती कार्यालयात हे मोफत नेत्र चिकित्सा व मोफत चष्मे वाटप शिबिर होणार आहे. जास्तीत जास्त नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन बाळासाहेबांची शिवसेनेचे रायगड जिल्हा संपर्कप्रमुख रामदास शेवाळे यांनी केले आहे.





**पनवेल : भजनसम्राट निवृत्तीबुवा चौधरी यांचा नातू व भाजप सांस्कृतिक सेलचे तालुका अध्यक्ष, रायगडभूषण गायक उमेश चौधरी यांचा चिरंजीव अॅड. वैभव आणि जनार्दन पाटील यांची कन्या हर्षदा यांचा साखरपुडा विसावा अम्युजमेंट पार्क अॅण्ड रिसॉर्ट येथे झाला. या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सदिच्छा भेट देऊन आशीर्वाद दिले. या सोहळ्यास विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.**

## वाहनांची कोंडी टाळण्यासाठी उपाययोजना

# ओरियन मॉलकडून वाहतूक वळवली



**पनवेल : प्रतिनिधी**

नवीन पनवेल-माथेरान महामार्गाला जोडणाऱ्या पुलाचे दोन्ही बाजूला पनवेलकडे येणाऱ्या मार्गीकेवर कॉंक्रीटीकरणाचे काम सुरू असल्याने वाहतूक कोंडी होत होती. वाहतूक पोलिसांनी नवीन पनवेलकडून मुंबईकडे जाणारी वाहतूक ओरियन मॉलच्या पुढून वळवल्याने जंक्शनला बुधवारी (दि. १६) वाहतूक कोंडी झाली नाही. वाहतूक सुरू राहिल्याने वाहनचालकांनी पोलिसांना धन्यवाद दिले.

नवीन पनवेल उड्डाणपुलाचे दोन्ही बाजूला कॉंक्रीटीकरण सुरू असल्याने सिग्नलच्या जंक्शनला मुंबईकडे येणाऱ्या मार्गावर वाहतूक कोंडी होत असल्याने वाहन चालकाना मोठा त्रास होत होता. सकाळी कामावर निघालेल्या अनेकांनी याबाबत तक्रार केली होती. वाहतूक पोलिसांनी त्याची दखल घेऊन पनवेलच्या सिग्नलवरून वाहतुकीच्या मार्गात बदल केला.

नवीन पनवेल उड्डाणपुलाचे पनवेल बाजूच्या सिग्नल वरुन वाहने उजव्या बाजूला वळण घेऊन मुंबई, ठाणे किवा नवी मुंबईला जातात. त्याठिकाणी मोठ्या प्रमाणात कोंडी होत असल्याने आता वाहने डाव्या बाजूने ओरियन मॉलच्या पुढे जाऊन यू टर्न घेऊन मुंबई दिशेला सोडण्यात येत आहेत. त्यामुळे सिग्नलवर वाहतूक कोंडी न होता वाहने जात आहेत. याबद्दल अनेक वाहन चालकांनी पोलिसांना धन्यवाद दिली.

> **पूलावरून येणाऱ्या वाहनांमुळे सिग्नलच्या जंक्शनला वाहतूक कोंडी होत होती. आम्ही नवीन पनवेलमधून मुंबईकडे जाणारी वाहतूक डावीकडे वळवून त्यांना ओरियन मॉलच्या पुढे जाऊन यू टर्न दिला. त्यामुळे वाहतूक सुरू राहिली. आता जंक्शनला कोंडी होत नाही.**
>
> **-संजय नाळे, वरिष्ठ निरीक्षक, वाहतूक शाखा**

# शाश्वत फाउंडेशनतर्फे मातृ-पितृ पूजन दिन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील सेक्टर १९च्या उद्यानात शाश्वत फाउंडेशन आणि अखिल भारतीय कच्छ कडवा पाटीदार युवा संघ या सामाजिक संस्थांनी मंगळवारी (दि. १४) वयोवृद्ध नागरिकांचे पूजन व सत्कार करून मातृ-पितृ पूजन दिन साजरा केला.

उपरोक्त कार्यक्रमात जवळपास १५० वयोवृद्ध नागरिकांची उपस्थिती होती. या दोन्ही संघटना दर १४ फेब्रुवारीला हा कार्यक्रम घेत असून या वर्षी दोन्ही संस्थांनी एकत्र मिळून सहावा मातृ-पितृ पूजन दिवस साजरा केला. भारतीय संस्कृतीवर पाश्चात्य संस्कृतीचे होणारे आक्रमण थांबवत संस्कृती संवर्धन करणे हा या उपक्रमामागील उद्देश असल्याचे संस्थेच्या अध्यक्ष बिना गोगरी यांनी सांगितले.

याचप्रमाणे १४ फेब्रुवारी २०१९ रोजी पुलवामा आतंकी हल्ल्यात शहीद झालेल्या सेनेच्या वीर जवानांना ही या वेळी श्रद्धांजली वाहण्यात आली. मावजीभाई पटेल व गुरूनाथ तनावडे या ज्येष्ठांनी दीप प्रज्वलन करून कार्यकमाचा शुभारंभ केला. प्रास्ताविक संस्थेच्या सचिव अंजू पटेल यांनी मांडले. गोगरी यांनी संस्थेचे कार्य व कार्यक्रम घेण्यामागचे उद्देश यावर उपस्थितांना माहिती दिली.

काही ज्येष्ठ नागरिकांनी स्वतःचे मनोगत व्यक्त करीत संस्थेच्या उपक्रमांचे कौतुक केले व भजन, गाणी प्रस्तुत करून कार्यक्रम मनोरंजक केला. नीता गोगरी, गीता पटेल, स्मीता आचार्य, नूतन सिंह, प्रमिला वानखेडे आदींच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वीपणे झाला.



# पोलीस ठाण्यात हळदीकुंकू समारंभ

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

व्हॅलेंटाईन डेनिमित्त उरण पोलीस ठाण्याच्या वतीने उरण तालुक्यातील महिला भगिनींसाठी हळदीकुंकू समारंभाचे नियोजनबद्ध आयोजन केले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दिपप्रज्वलन करून या हळदीकुंकू समारंभाचा प्रारंभ करण्यात आला. उरण महिला पोलीस उपनिरीक्षक अंजना गायकवाड, उपनिरीक्षक पदमजा पाटील, हवालदार रचना ठाकूर, प्रदेवी पाटील, नाईक प्रिती म्हात्रे, शिपाई प्रियंका पाटील, सुरेखा राठोड, वैशाली पाटील यांनी महिलांना हळदीकुंकू वाण देऊन पूजन केले.

मान्यवर महिलांचे महिला सक्षमीकरणाविषयी भाषणे झाली. उरण पोलीस ठाणे आयोजित हळदीकुंकू हा महिलांसाठी दरवर्षी आनंददायी, स्मरणीय पर्वणीच असते. तदनंतर संगीत खुर्ची, बलुन गेम, नाचगाणी असा रंगतदार कार्यक्रमात गायक देवेंद्र पाटील, वृषाली पाटील यांनी गायक केले.

कार्यक्रमासाठी उरणच्या माजी नगराध्यक्ष सायली म्हात्रे, विमल पाटील, आफशा मुकरी, कुसुम ठाकूर, लीना पाटी, वर्षा म्हात्रे, दिपाली पाटील, लता पाटील, रुपाली खाडे, अरुणा घरत, रेणुका पाटील, वंदना कोळी, सामीया बुबेरे, उरण पोलीस स्टाफ आदी महिला उपस्थित होत्या.

# उलवे नोडमध्ये माता पार्वती मूर्ती प्राणप्रतिष्ठापना सोहळा

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांची उपस्थिती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाशिवरात्रीच्या पार्श्वभूमीवर उलवे नोड सेक्टर ३ येथील लांगेश्वर महादेव मंदिरात शिवशक्ती नवयुग मित्र मंडळ आणि राजस्थानी प्रवासी संघ उलवे नोडच्या वतीने माता पार्वती मूर्ती प्राणप्रतिष्ठापना सोहळा मंगळवारी (दि. १४) आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यानिमित्त एक शाम गौ माता के नाम हा भजन संध्या कार्यक्रमदेखील झाला. या ठिकाणी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देत शुभेच्छा दिल्या.

या वेळी गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, सदस्य योगिता भगत, भाजपचे उलवे नोड १ अध्यक्ष मदन पाटील, वहाळचे उपसरपंच अमर म्हात्रे, विठ्ठल पाटील, वितेश म्हात्रे, पोलीस निरीक्षक रवींद्र पाटील, उपनिरीक्षक श्री. शेलार, सुहास भगत, दिलीप पाटील, मंजुळा कोळी, विक्रमसिंह चौहान, कानजीभाई पटेल, ईश्वर सिंह, पुनाराम देवासी, नेमाराम पटेल, ललित प्रजापति, प्रवीण गुर्जर, किशन चौधरी, पुरुषोत्तम लिमवत, लादू सिंह, मोहन चौधरी, नरेंद्र शिनोई, मनीष देवासी, सोहन देवासी, बलवंत सिंह, भाना राम, सुनील चौधरी, कैलास चौधरी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समाज बांधव-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय

# द बीबीसी क्रेच्छन

बीबीसीच्या दारात प्राप्तीकर विभागाचे अधिकारी का पोहचले हा 'क्रेच्छन' काही मोदीद्वेषाने पछाडलेल्या विरोधकांना पचनी पडताना दिसत नाही. करचुकवेगिरीच्या संशयामुळे बीबीसीचे भारतातील कार्यालय आधीच वादात आले होते. करचुकवेगिरीचे प्रकरण कुठल्याही क्षणी उजेडात येऊ शकते हे ओळखूनच छापे पडल्याचा कांगावा केला जात नाही ना असा संशय येतो. प्रत्यक्षात प्राप्तीकर विभागाच्या अधिकाऱ्यांनी बीबीसीच्या कार्यालयांमध्ये फक्त सर्वेक्षण केले. त्याला तांत्रिकदृष्ट्या छापे म्हणता येणार नाही.

**संपूर्ण जगामध्ये निर्भीड आणि निष्पक्ष बातमीदारीचा ठेंभा मिरवणाऱ्या ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशन म्हणजेच बीबीसीच्या भारतातील कार्यालयांवर मंगळवारी प्राप्तीकर विभागाने अचानक कारवाई केली. प्राप्तीकर खात्याचे बीबीसीवर छापे पडल्याचे वृत्त दिवसभर वाऱ्यासारखे पसरले होते, परंतु हे छापे नसून फक्त 'पाहणी' होती असे आता प्राप्तीकर विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. अर्थात या तथाकथित छाप्यांवरून विरोधकांनी केंद्र सरकारला धारेवर धरले हे तसे स्वाभाविकच म्हणावे लागेल. सन २००२ साली झालेल्या गुजरात दंगलींवर प्रश्नचिन्ह उभे करणारा एक लघुपट बीबीसीतर्फे मध्यंतरी प्रसारित करण्यात आला होता. 'इंडिया : द मोदी क्रेच्छन' असे या लघुपटाचे शीर्षक होते. गुजरात दंगलींबाबत तत्कालीन मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांनाच जबाबदार धरणारे वृत्तांकन या लघुपटात करण्यात आले आहे. साहजिकच यामुळे देशभरातील मोदी समर्थक नाराज झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आंतरराष्ट्रीय स्तरावर नाचक्की करण्याचा कुटिल हेतू डोळ्यासमोर ठेवून बीबीसीने हा लघुपट समाजमाध्यमांवर जारी केला हे लपून राहिलेले नाही. निर्भीड आणि निष्पक्षपाती वृत्तांकनाचा डंका पिटणाऱ्या बीबीसीचा इतिहास विपरित असाच आहे. पंतप्रधान मोदींवर आरोपांची चिखलफेक करणाऱ्या बीबीसीने निष्पक्षपातीपणाचा कितीही आव आणला तरी स्वत:च्या देशात ही वृत्तसंस्था कशी वागते हे सर्वश्रुत आहे. ब्रिटिश राजघराणे किंवा ब्रिटिश सरकार यांच्याविरोधात वृत्तांकन करताना बीबीसीचा पवित्रा नेहमीच हातचे राखून वागण्याचा असतो. 'आपला तो बाब्या आणि दुसऱ्याचे ते कार्टे' अशा वागण्याला निष्पक्षपातीपणा म्हणता येत नाही. बीबीसीने जारी केलेल्या लघुपटावर तत्काळ कारवाई झाली. त्यानंतर लगेचच प्राप्तीकर विभागाचे अधिकारी बीबीसीच्या कार्यालयात धडकल्याने विरोधकांचे फावले आहे. वास्तविक कथित करचोरी आणि आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी मूळ कारवाई बीबीसीच्या दिल्ली कार्यालयात झाली. त्याचाच एक भाग म्हणून मुंबईतील बीबीसी कार्यालयांतही प्राप्तीकर अधिकारी पोहचले. या वेळी कर्मचाऱ्यांचे लॅपटॉप, डेस्कटॉप तपासण्यात आले. अन्य डिजिटल दस्तावेजांचीही तपासणी झाली. या कारवाईमुळे केंद्रावर चौफेर टीका सुरू झाली. जगभरातील प्रसारमाध्यमे व मानवाधिकार संस्थांनी सरकारवर सडकून टीका केली आहे. ही कारवाई म्हणजे एक प्रकारची धमकीच असून अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी आहे, अशी तीव्र प्रतिक्रिया माध्यम वर्तुळामध्ये उमटते, परंतु करचुकवेगिरी किंवा आर्थिक गैरव्यवहाराचे प्रकरण असेल तर बीबीसीवर कायद्याप्रमाणे कारवाई व्हायलाच हवी. जगप्रसिद्ध माध्यम संस्थेला निष्पक्षपणाच्या नावाखाली वाट्टेल तसे वागण्याची मुभा कुठलाच कायदा देत नाही. प्रसिद्धी मिळवायची असेल किंवा टीआरपी वाढवून घ्यायचा असेल तर पंतप्रधान मोदी यांच्याविरुद्ध अनिर्बंध गरळ ओकली की काम सोपे होते, असा भारतातील अनुभव आहे. पंतप्रधान मोदींची लोकप्रियता जागतिक पातळीवर वाढल्याचे पाहूनच हा तथाकथित मोदी क्रेच्छन विचारण्यात आला असावा असा संशय येतो.**

# पोलादपुरात वणवे; आळा घालण्याची गरज

## खबरबात
शैलेश पालकर



पोलादपूर तालुक्यातील वणव्यांना आळा घालण्याची गरज निर्माण झाली आहे. १ ते ७ फेब्रुवारीदरम्यान वनवणवा प्रतिबंधक सप्ताह राबविण्यात येतो, मात्र या वर्षी सप्ताहाचे आयोजन तालुक्यात कोठेही झाले नाही. वनविभागाचे तालुका वन अधिकारी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी या वनवणव्यांविरोधात जनजागृती करण्याचा एकही कार्यक्रम घेतला नाही. यापूर्वीही ऑक्टोबर २०२२ मध्ये पोलादपूर तालुक्यातील ग्रामीण भागात एकाच दिवशी वन्यजीव सप्ताहानिमित्त ग्रामीण भागातील शेतकरी ग्रामस्थ आणि विद्यार्थ्यांमध्ये जनजागृतीपर मार्गदर्शनाचे आयोजन तालुका वन विभागामार्फत करण्यात आले होते.

पोलादपूर तालुक्यातील सडवली, काटेतळी, वाकण खांबेश्वरवाडी, परसुले, क्षेत्रपाळ व दिसेधोंड-रानबाजिरे या रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमध्ये वन्यजीव सप्ताहानिमित्त बिबटे, रानडुक्कर आणि रानगवे यांच्या वावराबद्दल तसेच या वन्यजीवांपासून संरक्षणासंदर्भात माहिती देण्यात आली. पोलादपूर तालुक्यातील वनविभागाच्या परिमंडळाने आतापर्यंत ठाणे नाका, माणगांव, सोलापूर, सातारा आदी ठिकाणी वन्यजीव तस्करीप्रकरणांमध्ये पोलादपूर तालुक्यातील आरोपी मुद्देमालासह पकडले असताना पोलादपूर तालुक्यातून वन्यजीव तस्करी होताना परिमंडळाच्या वनपाल आणि वनकर्मचाऱ्यांना माहितीही नाही.

तालुक्यात मार्गशीर्ष महिन्यापासून सुरू झालेले वणवे फाल्गुन महिन्याच्या मध्यावरही सुरू राहणार असून पारंपरिक शेतीचा एक अविभाज्य भाग म्हणून शेतात जाळले जाणारे तरवे उन्हाची झळ अनुभविण्यास लावणारी झळ सोसावयास लावणार आहेत. या उष्म्यासोबत दिवसा-दुपारी तब्बल ३२ ते ४० अंश सेल्सीयस तापमान वाढल्याचे दिसून येत आहे.

शेतीच्या मशागतीसाठी झाडांच्या नव्या फांद्या आणि पानांची कवळं काढून त्याचे शेतजमिनीवर राब पेटवून शेतीची मशागत करण्याची ही पारंपरिक पध्दत तालुक्यात सर्वत्र रूढ झाली आहे. यामुळे थेट सूर्यप्रकाशामुळे शेतजमिनीच्या मातीमध्ये नवीन पिकाच्या वाढीसाठी निर्माण होणारे सिलीकॉनीयस गुणधर्म असलेले पोषक द्रव्य संपूर्ण जळून जात असल्याचे आधुनिक कृषी तंत्रज्ञान सांगते. पोलादपूर तालुक्यात कवळं काढून राब पेटविण्याचा हंगाम आता सुरू झाला आहे. अनेक शेतामध्ये शेण, फांद्या, पानं असा राब अंथरला गेला आहे. यात सागवानी झाडांच्या पानांचा आणि कोवळ्या फांद्यांचा राबामध्ये जास्त उपयोग झाल्याचे दिसून येत आहे. यालाच कवळं काढणे असे म्हणतात. यामुळे सागाची झाडं बोडकी झाल्याचेही दृश्य सर्वत्र दिसून येत आहे. दुसरीकडे गेल्यावर्षी कवळं तोडताना चार ते पाच शेतकऱ्यांना हकनाक विजेच्या तारेला स्पर्श झाल्याने जीव गमवावा लागल्याचे दुर्दैवी सत्य तालुक्याला अनुभवावे लागले आहे. एकीकडे सागाची पाने जमिनीमध्ये विघटित होऊन त्यांचे मातीत रूपांतर होण्यास जास्त अवधी लागत असल्याचे कृषीविज्ञान सांगते. त्यामुळे सागमाफियांना हा हंगाम शेतीच्या मशागतीच्या निमित्ताने सागाची अवैध वृक्षतोड करण्यास प्रोत्साहित करणाराही ठरत आहे.

सवाद येथे एका गवताची उडवी जळण्याचा तर कापडे फौजदारवाडीसह धामणदिवी, सडे, सवाद, कोतवाल बुद्रुक आणि कोंढवी येथे वाडा जळून गुरे होरपळल्याच्या दूर्घटना गेल्या दोन वर्षांत झाल्या आहेत. तालुक्यात संध्याकाळी उंच डोंगरावर विद्युत रोषणाई केल्यासारखे वणव्यांचे दृश्य मनोहारी दिसत असले तरी हे वणवे भर दुपारी जेव्हा पेटतात तेव्हा पाणी टंचाई असलेल्या या तालुक्यात शेतकऱ्यांना त्यावर नियंत्रण ठेवणेदेखील अशक्य होत आहे. पोलादपूर तालुक्यातील माळरानावरील गवताचे प्रमाण पाहता ते तालुक्याला पशुधन संगोपनासाठी दुधदुभता तालुका अशी ओळख देण्यास उपयुक्त आहे. मात्र, तरीही नेमेचि येतो मग पावसाळा...प्रमाणे दरवर्षी लागतात येथे वणवे...असा दाहक अनुभव शेतकरी घेताना दिसत आहेत.

वास्तविकत: पावसाळी पिक घेऊन झाले की जमीन ओलसर असतानाच शेताची नांगरणी केल्यानंतर सूर्यप्रकाश आणि सूर्यकिरणे थेट जमिनीत मातीमध्ये शिरून माती भुसभूशीत होण्यास मदत होतेच, पण यासोबतच नंतरच्या पिकासाठी पोषक अशा सिलीकॉनीयस द्रव्याची निर्मिती होऊन पिके जोमाने वाढतात. हा कृषी विज्ञानाचा शोध तालुक्यातील तापमानवाढीसोबतच धूरामुळे होणाऱ्या प्रदुषणावरही नियंत्रण मिळविण्यास साह्यभूत ठरणार आहे. याखेरिज जगाला भेडसावणारी जागतिक तापमानवाढीची म्हणजेच ग्लोबल वॉर्मिंगची समस्यादेखील यामुळे पोलादपूरचे तापमान वाढविण्यास कारणीभूत ठरत आहे. वातावरणाचे संतुलन बिघडविण्यास हे राब जाळण्याची मशागतीची पारंपरिक पध्दत मदत करीत आहे.

दहा वर्षांपूर्वी गवत कापणी करून मुंबईसह देशातील तबेल्यांमध्ये गवतपुरवठा करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना साथ देणाऱ्या पोलादपूरकरांना गवताचा आणि मेहनतीचाही पैसा न मिळाला नव्हता. त्यामुळे गवतकापणीसाठी कोणीही अनूकूल नाही. जत्रोफा लागवड करण्याचे आमिष दाखविणाऱ्यांनी 'पेरले बी आणि उगवले गवत' अशी फसवणूक केल्याने शेतकरी आता भातशेती आणि रबी हंगामातील भाजीपाल्याखेरिज कोणतेही उत्पादन घेत नसल्याने अन्य शेतकरी बांधावरील गवत कापायलादेखील शेतावर या हंगामात फिरकत नाहीत. पोलादपूर तालुक्यात मुबलक असलेल्या गवताचा वापर करून पशूखाद्यासह पुठ्ठे व कोरूगेटेड बॉक्सची निर्मिती करण्यासाठी आवश्यक लगदा या गवतापासून तयार करण्याचे कृषीपूरक उद्योग शक्य असूनही त्यादृष्टीने कोणतेही प्रयत्न होत नसल्याने दरवर्षी हजारो टन वणव्यामुळे जळून खाक होत आहे.तालुका कृषी कार्यालय आणि पंचायत समितीच्या कृषी विभागासह विविध समाजाच्या पुढाऱ्यांनीही तालुक्यातील राब जाळण्याच्या पारंपरिक जुन्या मशागतीबाबत ग्रामीण जनतेचे प्रबोधन करण्याची आवश्यकता आहे. याखेरिज, गवत कोवळे असतानाच माळावरून काढून पशूधन संवर्धनासाठी वापर झाला तर दरवर्षी वणवे लागण्याच्या प्रमाणात घट होऊन हवेमधील अचानक वाढणारा उष्मा कमी होऊ शकणार आहे. पाणलोट समित्यांच्या प्रयत्नाने नजिकच्या काळात पाणी अडविले तरी ते जिरल्यानंतर जमिनीतील पाण्याची वाफ मोठ्या प्रमाणात होऊन सिंचनाचे प्रयत्नच अयशस्वी ठरण्याची शक्यता असल्याने राबाचे तरवे आणि अकाली वणवे लागण्याचे प्रकार थांबविले गेले पाहिजेत, अशी अपेक्षा तालुक्यात कार्यरत कृषीविषयक स्वयंसेवी संस्थांकडून व्यक्त होत आहे.तालुक्यात संध्याकाळी उंच डोंगरावर विद्युत रोषणाई केल्यासारखे वणव्यांचे दृश्य मनोहारी दिसत असले तरी हे वणवे भर दुपारी जेव्हा पेटतात तेव्हा पाणी टंचाई असलेल्या या तालुक्यात शेतकऱ्यांना त्यावर नियंत्रण ठेवणे देखील अशक्यप्राय होत आहे. पोलादपूर तालुक्यातील माळरानावरील गवताचे प्रमाण पाहता ते तालुक्याला पशुधन संगोपनासाठी दुधदुभता तालुका अशी ओळख देण्यास उपयुक्त आहे, मात्र प्रत्यक्षात या पशूधनाचाच बळी वणव्यांमध्ये गुरांचे वाडे जळून खाक झाल्याने जात असल्याचे दिसून आले आहे. गेल्या वर्षभरात धामणदिवी, सडे, सवाद, कोतवाल बुद्रुक तसेच अन्य गावांत गुरांचे वाडे वणव्यांमध्ये जळून खाक झाल्याच्या घटनांत गुरे दगावण्याचे व गंभीर जखमी होण्याचेही प्रकार घडले आहेत. पावसाळ्यानंतर गुरांना दिवसभर गायरान जमीनीवरील गवत चरायला सोडून सायंकाळी वाडयाकडे परतण्याची नैसर्गिक सवय असल्याचे तालुक्यातील शेतकऱ्यांचा अनुभव आहे. पावसाळ्यातही कोवळे गवत खाण्यासाठी गुरे वाड्याबाहेर जात असतात. त्यामुळे गवताचे मुबलक प्रमाण असल्याने केवळ झोडणीनंतर भाताचे भारेच साठा करून ठेवण्याची पध्दत तालुक्यात रूढ आहे.

पोलादपूर तालुक्यात मुबलक असलेल्या गवताचा वापर करून पशूखाद्यासह पुठ्ठे व कोरूगेटेड बॉक्सची निर्मिती करण्यासाठी आवश्यक लगदा या गवतापासून तयार करण्याचे कृषीपूरक उद्योग शक्य असूनही त्यादृष्टीने कोणतेही प्रयत्न होत नसल्याने दरवर्षी हजारो टन वणव्यामुळे जळून खाक होत आहे.

दरम्यान, पोलादपूर तालुक्यातील सडवली, काटेतळी, वाकण खांबेश्वरवाडी, परसुले, क्षेत्रपाळ व दिसेधोंड-रानबाजिरे या रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमध्ये वन्यजीव सप्ताहानिमित्त बिबटे, रानडुक्कर आणि रानगवे यांच्या वावराबद्दल तसेच या वन्यजीवांपासून संरक्षणासंदर्भात माहिती देण्यात आली. मात्र, पोलादपूर तालुक्यातील ग्रामस्थांना वणवे आणि तरवे याबाबत जनजागृती करण्याचा कार्यक्रम कर्मचारी संख्या बदल्या झाल्यामुळे घटल्यामुळे शक्य झाला नाही, असे परिमंडळ पोलादपूरचे वनपाल शाम गुजर यांनी सांगितले.

## बदलते तंत्रज्ञान

# व्हॉट्सअ‍ॅपमध्ये आता सेव्ह करता येणार गायब मेसेज

व्हॉट्सअ‍ॅप हे एक सोशल मीडिया प्लॅटफॉर्म आहे. हे मेटाच्या मालकीचे आहे. यावरून



तुम्ही एकमेकांशी संवाद साधू शकता. व्हॉट्सअ‍ॅप आपल्या वापरकर्त्यांसाठी नवनवीन फीचर्स लॉन्च करत असते. व्हॉट्सअ‍ॅप असेच आणखी एक फिचर आपल्या वापरकर्त्यांसाठी घेऊन आले आहे. इन्स्टंट मेसेजिंग ॲपने बीटा वापरकर्त्यांसाठी Kept Messages हे फिचर आणले आहे. व्हॉट्सअ‍ॅपच्या अनेक फीचर्सबद्दल माहिती देणारी वेबसाईट WaBetaInfo च्या माहितीनुसार लोकप्रिय असणाऱ्या व्हॉट्सअ‍ॅपने जानेवारी २०२३ मध्ये पहिल्यांदा केप्ट मेसेज या फीचरची घोषणा केली होती.

हे फीचर रोल आऊट केल्यानंतर व्हॉट्सअ‍ॅप वापरकर्त्यांना डिस्पेअरिंग फीचरद्वारे चॅटिंग मेसेज ठराविक काळासाठी सेव्ह करू शकणार आहेत. तसेच यामध्ये चॅटिंग मधील मेसेज किती वेळानंतर डिलीट किंवा गायब होणार ते वापरकर्ते यामध्ये ठरवू शकणार आहेत.


WaBetaInfoच्या अहवालानुसार अँड्रॉइड स्मार्टफोन वापरणाऱ्या व्हॉट्सअ‍ॅपच्या बीटा वापरकर्त्यांना लेटेस्ट ॲपवर हे २.२३.४.१० सह कॅप्चर केलेले केप्ट मेसेज हे फिचर मिळणार आहे. उपलब्ध पर्यायांमुळे व्हॉट्सअ‍ॅप वापरकर्ता ठराविक वेळेसाठी अन्य वापरकर्त्यासोबत मेसेज चॅट करू शकणार आहे. ठराविक वेळेनंतर हे मेसेज आपोआप चॅटबॉक्समधून डिलीट होतात.हे नवीन फीचर बीटा टेस्टर्ससाठी लॉन्च करण्यात आले आहे. व्हॉट्सअ‍ॅप हे मेसेज फिचर भविष्यात अधिक वापरकर्त्यांपर्यंत वाढवण्याचा विचार करत आहे. सध्या व्हॉट्सअ‍ॅपने अँड्रॉइड वापरकर्त्यांसाठी नवीन फीचरचे अपडेट देण्यासाठी सुरुवात केली आहे. आयफोन वापरकर्त्यांना हे फीचरचे अपडेट कधीपर्यंत मिळेल याची कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

**Kept Messages असे करते काम**

Kept Messages हे फीचर व्हॉट्सअ‍ॅप वापरकर्त्यांना गायब झालेल्या फीचरवर नियंत्रण ठेवण्याचा ऑप्शन देते. या मेसेज फिचरच्या मदतीने व्हॉट्सअ‍ॅप वापरकर्ते चॅट्सना सेव्ह करू शकतात. सेव्ह केलेले चॅट्स या नवीन फीचरमुळे कोणीही पाहू शकतो. ते नेहमी चॅटबॉक्समध्ये दिसेल. केप्ट मेसेज या फिचर अंतर्गत सेव्ह केलेल्या चॅट्स अन-कीप करण्याचा पर्याय वापरकर्त्यांकडे असणार आहे. जसे वापरक्रते मेसेज अन कीप करतील तेव्हा मेसेज गायब होतील.

# भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक दादासाहेब फाळके

## निमित्त



भारतीय चित्रपट कलेला वैभव मिळवून देणाऱ्या दादासाहेब फाळकेंना भारतीय चित्रपटांचा जनक मानले जाते. १९१३ साली त्यांनी तयार केलेला पहिला मूक चित्रपट 'राजा हरिश्चंद्र' चित्रपट सृष्टीच्या इतिहासातील पहिला चित्रपट आहे. आपल्या १९ वर्षांच्या कारकिर्दीत १९३७ पर्यंत दादासाहेब फाळकेंनी ९५ चित्रपटांची आणि २६ लघुपटांची निर्मिती केली. आज १५ फेब्रुवारीला त्यांचा स्मृतीदिन आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया त्यांच्याविषयी...

भारतीय चित्रपट सृष्टीतील सर्वात मानाचा समजला जाणारा दादासाहेब फाळके पुरस्कार आज भारतीय अभिनेत्यांना त्यांच्या चित्रपट कारकिर्दीतील योगदानाबद्दल बहाल करण्यात येतो. दादासाहेब फाळकेंचा जन्म ३० एप्रिल १८७० ला नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर येथे झाला. वडील प्रसिद्ध संस्कृत तज्ञ होते. दादासाहेबांनी सर जे.जे. स्कूल ऑफ आर्ट मुंबई येथे १८८५ साली प्रवेश घेतला. १८९० मध्ये उत्तीर्ण झाल्यानंतर बडोदा गाठले आणि शिल्पकला, चित्रकला, तंत्रज्ञान, रेखाटन, छायाचित्रण या कला आत्मसात केल्या.

काही काळ गोध्रा येथे छायाचित्रकार म्हणून व्यवसाय केला, परंतु त्याठिकाणी आलेल्या भयंकर अश्या प्लेगच्या साथीने त्यांच्या पत्नी आणि लहान बाळाचा जीव गेल्यानं त्यांना गोध्रा सोडावे लागले. काही काळ भारतीय पुरातत्व सर्वेक्षण खात्यात त्यांनी नौकरी देखील केली, परंतु मूळ स्वभाव धडपड्या असल्याने त्याचे मन जास्त काळ नौकरीत रमले नाही. पुढे त्यांनी छपाईचा व्यवसाय सुरू केला. छपाई तंत्रज्ञानात त्यांना चांगली गती होती. राजा रविवर्मांसोबत देखील दादासाहेबांनी काम केले. पुढे या क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान शिकण्याकरता ते जर्मनीला जाऊन आले. छपाई व्यवसायात जम बसविण्याचा प्रयत्न करत असतांना त्यांचे आपल्या इतर सहकाऱ्यांशी वाद झाले आणि त्यांनी छपाई व्यवसाय सोडला.

पुढे एकदा 'लाईफ ऑफ ख्रिस्त' हा चित्रपट त्यांच्या पाहण्यात आला. आणि तेथून त्यांच्या जगण्याची दिशाच बदलली. दादासाहेबांनी चल चित्रपट बनविण्याचा ध्यास घेतला आणि अथक प्रयत्नांनी १९१२ साली पहिला भारतीय मूक चित्रपट 'राजा हरिश्चंद्र' काढला. हा चित्रपट मुंबई येथील कॉरोनेशन चित्रपट गृहात पहिल्यांदा प्रदर्शित झाला.

दादासाहेबांच्या या धडपडीमागे त्यांच्या पत्नी सरस्वतीबाई (दुसरी पत्नी) यांची मोलाची साथ होती. आपल्या पतीचे स्वप्ने सत्यात उतरविण्यासाठी सरस्वतीबाईंनी आपले दागिनेदेखील विकले. चित्रपटाशी संबंधित लोकांचा स्वयंपाक करणे, त्यांचे कपडे धुणे, त्यांच्या राहण्याची सोय करणे, शिवाय हे करून चित्रपटाशी संबंधित एडिटिंग, मिक्सिंग, फिल्म डेव्हलपिंग, कॅमेरा असिस्टंट, स्पॉट बॉय या भूमिकादेखील त्यांनी पार पाडल्या.

**दादासाहेब फाळके यांनी तयार केलेले चित्रपट** – राजा हरिश्चंद्र (१९१३), मोहिनी भस्मासुर (१९१३), सावित्री सत्यवान (१९१४), श्रीकृष्णजन्म (१९१८), कालिया मर्दन (१९१९), सेतुबंधन (१९३२), गंगावतरण (१९३७)

**सन्मान** –दादासाहेब फाळके यांच्या सन्मानार्थ मुंबईतील फिल्मसिटीला दादासाहेब फाळके चित्रनगरी असे नाव देण्यात आले आहे. दादासाहेब फाळके पुरस्कार हा भारतीय चित्रपट सृष्टीत असामान्य कामगिरी करणाऱ्या कलावंत आणि तंत्रज्ञांना भारत सरकारच्या वतीनं दिला जाणारा सर्वोच्च पुरस्कार आहे. १९६९ या दादासाहेब फाळके यांच्या जन्मशताब्दी वर्षापासून हा पुरस्कार दिल्या जात आहे. भारत सरकारच्या माहिती आणि नभोवाणी खात्यातर्फे हा पुरस्कार प्रदान केला जातो. दरवर्षी भरविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय पुरस्कार सोहळ्यात हा पुरस्कार देण्यात येतो.

दादासाहेब फाळके यांच्या जीवनावर 'हरिश्चंद्राची फैक्ट्री' हा चित्रपट बनविण्यात आलाय. नाशिक येथे चित्रपट महर्षी दादासाहेब फाळके यांच्या स्मृतीप्रित्यर्थ पांडवलेणी च्या पायथ्याशी फार मोठे स्मारक उभारण्यात आले असून या ठिकाणी गाण्यांच्या तालावर नाचणारी कारंजी असून चित्रपट सृष्टीशी संबंधित मोठे संग्रहालय देखील आहे आणि खुला रंगमंचदेखील तयार करण्यात आला आहे.

**(साभार : माझीमराठी)**

## क्लिक...क्लिक...!



**अलिबाग : उन्हाची दाहकता वाढत असल्याने नागरिकांनी पर्यटनाकडे पाठ फिरवली आहे. त्यामुळे नेहमीच पर्यटकांची गर्दी असणारा तालुक्यातील किहीम बीच सध्या सुना सुना वाटत होता.** (छाया : सायली रावले-वैद्य)

## आरोग्य प्रहर

# सरता हिवाळा, लहान मुलांची तब्येत सांभाळा!

उत्तर भारतासह देशातील बहुतांश भागात थंडी हळूहळू कमी होत आहे. हवामानातील बदलाचा सर्वांत जास्त परिणाम



मुलांच्या आरोग्यावर होतो. थंडीचा ऋतू जात असताना मुलांमध्ये खोकला, सर्दी किंवा ताप यांसारखे विषाणूजन्य आजार होऊ शकतात. डॉक्टरांच्या सांगण्यानुसार, मुले कोणतीही तयारी न करता घराबाहेर पडतात आणि या काळात हवामान आणि त्यांच्या शरीराचे तापमान वेगळे असते. बदलत्या तापमानामुळे मुले काही वेळातच विषाणूची शिकार होतात आणि आजारी पडतात, मात्र काही घरगुती उपायांचा वापर करून तुम्ही मुलांचा सर्दी-खोकल्यापासून बचाव करू शकता. त्यामुळे त्याची रोगप्रतिकारक खूप वाढते.

**आल्याचा रस प्या** – आलं हे आपण रोजच्या आहारात खातोच. आल्याच चहा प्यायल्याने ताजेतवाने वाटते व सर्दीचा त्रासही कमी होतो. तसेच पोट, छाती आणि घशाच्या समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी तुम्ही आल्याच्या रसाची मदत घेऊ शकता. आल्याच्या रसामध्ये असे अनेक घटक आढळतात ज्यामुळे काही क्षणात या समस्यांपासून आराम मिळतो. त्याची चव थोडी उग्र असते, म्हणून थोडा मध मिसळून आल्याचा रस मुलांना प्यायला द्यावा. हा उपाय दिवसातून तीन वेळा केल्यास त्रास हळूहळू कमी होईल.

**जायफळाचा वापर ठरेल उपयोगी** – थंडी छातीत साचून राहिल्याने मुलांना सर्दी, खोकल्याचा त्रास होऊ शकतो. त्यापासून आराम मिळवण्यासाठी तुम्ही जायफळाचा वापर करू शकता. जायफळाचा प्रभाव गरम असतो आणि गेल्या अनेक शतकांपासून त्याचा औषध म्हणूनही उपयोग केला जातो. मोहरीच्या तेलात जायफळ गरम करून मुलांच्या छातीवर आणि पायाच्या तळव्यावर लावा, मात्र हा उपाय केवळ रात्रीच करायचा असतो, हे नक्की लक्षात ठेवा.

**हळदीचे दूध ठरते गुणकारी** – बदल्या वातावरणामुळे मुलांना सर्दी-खोकल्याचा त्रास झाल्यास हळदीचे दूध पिणे हा अतिशय उत्तम उपाय ठरतो. हळदीमध्ये अनेक औषधी गुणधर्म असतात, हे तर तुम्हाला माहीत असेलच तसेच दूध हेही पूर्णान्न मानले जाते. हळदीमध्ये अँटी-बॅक्टेरिअल व अँटी-सेप्टिक गुणधर्म असतात, जे आरोग्यासाठी खूप फायदेशीर ठरतात. त्यामुळे हळदीचे दूध पिणे हेही उपयोगी ठरते. हळदीमध्ये भेसळ होण्याची भीती असल्यास कच्च्या हळदीचे दूध बनवून मुलांना प्यायला द्यावे. तसेच लसूण मोहरीच्या तेलाने मसाज करणे हा देखील सर्दीपासून मुक्त होण्याचा एक चांगला मार्ग आहे, अशा काही उपायांनी तुम्ही सर्दी-खोकल्याचा त्रास दूर करू शकता.

# माथेरान मिनीट्रेनचे इंजिन आले रुळावरून खाली

## प्रवाशांना मनस्ताप; दुसरी गाडीही रद्द



**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ येथून माथेरानकडे जात असताना मिनीट्रेनच्या इंजिनमध्ये बुधवारी (दि. १५) बिघाड झाल्याने पर्यटकांचे मोठे हाल झाले. त्यावेळी त्या मिनीट्रेनमधून ८० प्रवासी होते. त्या प्रवाशांना मध्य रेल्वेने त्यांच्या तिकिटांचे पैसे परत देण्याचा निर्णय घेतला आहे. शिवाय इंजिन रुळावरून खाली उतरल्याने एक प्रवासी गाडी रद्द करण्यात आली.

नेरळ-माथेरान-नेरळ ५२१०५ ही गाडी निघाली होती. बुधवारी दुपारी साडेबारा वाजता वॉटर पाईप स्टेशन येथे पोहचली आणि ती मिनीट्रेन घेऊन जाणारे इंजिन एनडीएम ४०६ हे रुळावरून खाली आले. त्यानंतर नेरळ येथून नॅरोगेज रुळावरून खाली उतरलेले इंजिन उचलण्यासाठी कामगार वर्ग बोलाविण्यात आले, मात्र रुळावरून इंजिन उतरले की, किमान दोन तासांचा कालावधी गाडी उचलण्यासाठी लागत असतो. हे लक्षात घेऊन मध्य रेल्वे प्रशासनाने त्या गाडीतील ८० प्रवाशांच्या तिकिटाचे पैसे परत देण्याचा निर्णय घेतला.

त्या सर्व प्रवाशांनी माथेरान स्थानकात जाऊन आपल्या तिकिटाचे पैसे परत घ्यावेत, असे सूचित करण्यात आले. त्यानंतर सर्व प्रवाशांनी वॉटरपाईप स्टेशन बाहेर येऊन नेरळ-माथेरान प्रवासी टॅक्सीमधून दस्तुरी असा प्रवास केला आणि माथेरानमध्ये पोहचले.

रुळावरून उतरलेल्या मिनीट्रेनचे इंजिन सव्वातीन वाजता उचलण्यात आले आणि त्यानंतर ५२१०५ ही गाडी वॉटर पाईप स्थानकातून नेरळ करिता सोडण्यात आली. कोणत्याही प्रवाशाविना वॉटर पाईप स्थानकातून निघालेली ती मिनीट्रेन पुन्हा एकदा जुम्मापट्टी स्थानकात थांबविण्यात आली, तर तिकडे माथेरान स्थानकातून नेरळकरिता दुपारी २ वाजून ३५ मिनिटांनी सोडली जाणारी मिनीट्रेनची फेरी रद्द करण्यात आल्याने पर्यटकांचे नेरळपर्यंत जाण्याचे स्वप्न अधुरे राहिले.

माथेरान येथून नेरळकरिता दररोज दोन प्रवासी गाड्या सोडल्या जातात, त्यापैकी एकच गाडी सोडण्यात आली आणि ती गाडी माथेरान स्थानकातून दुपारी ४ वाजता निघाली आणि पर्यटकांना घेऊन सायंकाळी ७ वाजता नेरळ स्थानकात पोहचली, मात्र इंजिन रुळावरून खाली उतरल्याने वॉटर पाईप स्थानकातून दुपारी ३ वाजून २० मिनिटांनी नेरळकरिता प्रवास सुरू करणारी ५२१०५ ही रिकामी मिनी ट्रेन नेरळ स्थानकात रात्री नऊ वाजता पोहचली. त्यामुळे प्रवाशांमधून नाराजी व्यक्त करण्यात आली.

# रायगड सामाजिक, आर्थिक समालोचन पुस्तिकेचे प्रकाशन

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्याचे सन २०२२चे जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन या पुस्तिकेचे प्रकाशन जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालय येथे झाले.

या वेळी जिल्हा नियोजन अधिकारी जयसिंग मेहेत्रे, सांख्यिकी कार्यालयाच्या उपसंचालक वृषाली माकर, सांख्यिकी अधिकारी प्रितम ईश्वरे, सहाय्यक संशोधन अधिकारी नसिरा पठाण, सांख्यिकी सहाय्यक दिप्ती पांडे, पल्लवी फालक व अंकुर जाधव उपस्थित होते.




**रोहा नगर परिषद**
**ता. रोहा, जि. रायगड पिन कोड नं. ४०२१०९**

क्र. रोनप/बांवि/ई-निविदा सुचना/ १६३७/२०२२-२३ दिनांक १५-०२-२०२३

**जाहीर ई-निविदा सूचना**

रोहा नगरपरिषद हद्दीतील विकास कामाकरिता कामाचा अनुभव असणा-या ठेकेदाराकडून विहित नमुन्यात ई-निविदा मागविणेत येत आहेत. सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई-निविदाद्वारे ऑनलाईन पद्धतीने संगणक प्रणालीवर होईल. सदर निविदा सुचना प्रसिद्धी, आवश्यक असणारी कागदपत्रे, शुद्धीपत्र इत्यादी माहिती https://www.maha tenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक **१६-०२-२०२३** रोजीपासून उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. निविदा सादर करण्याची अंतिम तारीख दिनांक **२३-०२-२०२३** रोजीपर्यंत राहील.

सही/-
(डॉ. धीरज चव्हाण)
मुख्याधिकारी
रोहा नगर परिषद


# खोपोलीतील भगवान महावीर गार्डनचा होणार कायापालट



**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली नगरपालिकेच्या मालकीचे भव्य गार्डन म्हणून शास्त्रीनगरमधील भगवान महावीर गार्डनची ओळख आहे. कोरोना काळात गार्डन बंद राहिल्याने गार्डनमधील खेळणी व अन्य साहित्याचे प्रचंड नुकसान झाले होते. त्यामुळे पालिकेकडून या गार्डनच्या दुरुस्तीच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे. याबाबत नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे. कामे होईपर्यंत भगवान महावीर गार्डन नागरिकांसाठी ठेवण्यात आले आहे.

गार्डनच्या विकासासाठी सुमारे १० लाखांचा निधी खर्च करण्यात येणार असल्याचे पालिकेकडून सांगण्यात आले आहे.

शहराचे वैभव असलेल्या महावीर गार्डनसाठी वाढीव निधी खर्च होऊन हे गार्डन अद्ययावत होत असल्याचा आनंद नागरिकांत आहे.

> **गार्डनमधील खेळणी, चालण्याचे ट्रॅक व अन्य सामुग्री अद्ययावत करण्यात येत आहे. त्याचसोबत नव्याने काही खेळणी व सुविधा निर्माण केल्या जात आहेत.**
> **-अनुप दुरे-पाटील, मुख्याधिकारी, खोपोली**

# मतदान केंद्रस्तरीय अधिकारी श्रीलेश सुर्वे यांचा सन्मान

**मुरुड : प्रतिनिधी**

राष्ट्रीय मतदार दिन स्पर्धा २०२३ दरम्यान केंद्रस्तरीय अधिकारी श्रीलेश सुर्वे यांनी केंद्र ३५६, ३५७ वार्ड क्रमांक ९ व १० या वार्डात जाऊन विविध जनजागृती केली, यासंबंधी केलेल्या कार्याबद्दल जिल्हाधिकारी कार्यालयाने दखल घेऊन जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांच्या हस्ते श्रीलेश सुर्वे यांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

डॉ. योगेश सुर्वे हे महसूल खात्याची सर्व कामे करण्यात पारंगत असून शासकीय योजना लोकांपर्यंत पोहचवण्याचे महत्त्वपूर्ण काम करीत असतात. त्यांचा लोकपरिचय दांडगा असून शासनाच्या योजना लोकांपर्यंत पोहचवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य ते करीत असतात.




**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE (EXTENSION)**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical Contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification:

| Sr. No. | Tender/Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No.** EE/EHV (O&M)/DIVN/MHD/ Tech/E-Tender-57/ 2022-23 Dtd. 07.02.2023 **RFx No. 7000026115** | **Sub:** Extension for SRM E-Tender for the work of replacement of 22 kV twin bus for bus section 1 at 220 kV Mahad Substation under EHV (O&M) Division, Mahad for the year 2022-23. | Up to Rs. 5,44,945/- (Including GST + 1% Labour Cess) |

**EMD** will be 1% of the **Estimated Cost** or Rs. 5,000/- whichever is higher
**Tender Fee**: Rs. 500/- plus GST + 1% Labour Cess.
**Bid Submission is From:** 16.02.2023 @ 00:00 Hrs to 22.02.2023 @ 23:59 Hrs for above tender. For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The Add'l Executive Engineer, (O): Phone No. 7373101089
**Note:** All eligible Suppliers/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Mahad**


# ऑनलाईन व्यवहार सावधतेने करा

## रिझर्व बँकेचे अजय मिचयारी यांचे आवाहन

**कर्जत : प्रतिनिधी**

आज डिजिटल बँकिंगमुळे सर्वच क्षेत्रात सुलभता आली आहे. काही वेळा मोबाईलमध्ये आर्थिक मोहाचे संदेश येतात. त्यामुळे त्या मोहात पडल्यावर खूप आर्थिक नुकसान होऊ शकते. त्यामुळे सावधतेने व्यवहार करा, नियोजनबद्ध बचत करण्याकडे आपला कल असला पाहिजे, असा सल्ला भारतीय रिझर्व बँकेचे क्षेत्रीय निर्देशक अजय मिचयारी यांनी येथे दिला.

भारतीय रिझर्व बँक वित्तीय समावेशन आणि विकास विभाग मुंबई कार्यालयाच्या वतीने बँक ऑफ इंडिया कर्जत शाखेच्या सहकार्याने आर्थिक साक्षरता कार्यक्रमाचे आयोजन केले होते. समारंभाचे उद्घाटन अजय मिचयारी यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी महाव्यवस्थापक कल्पना मोरे, विभागीय व्यवस्थापक शंपा बिसवास, व्यवस्थापक नरेंद्र कोकरे, विश्वजित करंजकर, बँक ऑफ इंडियाचे जिल्हा समन्वयक विजयकुमार कुलकर्णी, नाबार्डचे संदीप अपसुंडे, पद्मावती गायकवाड, हेमलता चिंबुलकर आदी उपस्थित होते.

सुरवातीला कालभैरव विद्यालय किरवलीच्या विद्यार्थिनींनी इशस्तवन व स्वागत गीत सादर केले. पालघर जिल्ह्यातील जव्हार तालुक्यातील कडचिमोट गावातील सोनू म्हसे यांनी जुन्या काळातील घांगळी वाद्य वाजवून उपस्थितांना बँकेचा संदेश दिला. देवदास सांबरी या आदिवासी मुलाने राजेंद्र बोराडे यांच्या ढोलकीच्या साथीने गणेश गीत सादर केले. हरेश तांबोळी आणि कल्पेश दळवी यांनी अभिजीत करंजकर यांच्या साथीने व आकाश काटे, भूषण म्हसे यांच्या ढोलकीच्या तालावर बँकेविषयीचा गैरसमज दूर करून बँकेत खाते उघडून आपली बचत करण्याचा संदेश दिला. कल्पना मोरे यांनी, महिलांनी विशेषतः आदिवासी महिलांनी बँकेत जाताना घाबरायचे नाही, असे स्पष्ट केले. या वेळी स्त्रीशक्ती पुरस्कार विजेत्या ठमाताई पवार यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

शंपा बिसवास यांनी, महिला सर्वोत्तम व्यवस्थापक आहे. महिलांना पंतप्रधान स्वनिधी अंतर्गत दहा हजारांपासून दहा लाखांपर्यंत कर्ज मिळू शकते. बचत गटालासुद्धा कर्ज दिले जाते, असे सांगितले. सूत्रसंचालन विश्वजित करंजकर यांनी केले, तर आभार विजयकुमार कुलकर्णी यांनी मानले.




**पनवेल महानगरपालिका**
**ता. पनवेल, जि. रायगड**

**जाहिर निविदा सूचना**

**पनवेल महानगरपालिका क्षेत्रात नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वित करणेकरीता जागा / इमारत भाडेतत्वावर घेणेबाबत.**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वित करणेकरीता तळमजला अथवा तळमजला + पहिला मजला वरील जागा भाडेतत्वावर घेणेकामी इच्छुक व्यक्ती / संस्था यांचेकडून अर्ज मागविणेत येत आहेत.

सदरच्या जागा / इमारती या बांधकाम पूर्ण असलेल्या, वाहनतळ व शौचालय या सुविधांयुक्त असाव्यात. जागा / इमारत भाडेतत्वावर घेणेचा कालावधी २ वर्षांचा असेल.

| अ.क्र. | नोड | ठिकाण | आवश्यक जागेचे क्षेत्रफळ |
|---|---|---|---|
| १) | कळंबोली | सेक्टर – १६ई / १७ / २० | १५०० ते २००० चौ. फुट |
| २) | खारघर | देवीचा पाडा | १५०० ते २००० चौ. फुट |
| ३) | खारघर | सेक्टर – ३६ | १५०० ते २००० चौ. फुट |
| ४) | खारघर | तळोजा फेज – १ | १५०० ते २००० चौ. फुट |
| ५) | कामोठे | सेक्टर – ३४ | १५०० ते २००० चौ. फुट |

इच्छुक व्यक्ती / संस्था यांनी जागेचे ठिकाण, अपेक्षित भाडे इ. तपशीलासह अर्ज पनवेल महानगरपालिकेच्या panvelcorporation@gmail.com या ई-मेलआयडी वर दिनांक २१/०२/२०२३ रोजी दुपारी ३:०० वा. पर्यंत सादर करावेत.

Sd/-
अति. आयुक्त,
पनवेल महानगरपालिका

जा. क्र/पमपा/माव्य/३५२३/प्र.क्र.०२/२९/२०२३
दिनांक १५/०२/२०२३



**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical Contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.
**Tender Fee:** Rs. 500/- + GST.

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No.: 7000026194** **Tender No.:** EE/EHV (O&M)/DN/PNL/ e-Tender-57/2022-2023. RFx E-Tender for Work of Stub Strengthening & Chimney Height Raising of 220kV Nagothane - Wadkhal 1 & 2 D/C line at Loc. No. 39,43,54,55,56,57,58,48 in Creek Area on Urgent Basis under EHV(O&M) Division, Panvel. **Tender Amount:** Rs. 11,96,867/- **EMD Amount:** Rs. 11,969/- |
| 2 | Online Downloading of the RFx | 16.02.2023, 18:00 Hrs. to 23.02.2023, 23:59 Hrs. |
| 3 | Online Submission of the RFx | On or Before 23.02.2023 up to 23:59 Hrs. |
| 4 | Online Opening of the Techno-Commercial RFx | 24.02.2023 at 11:00 Hrs (if Possible) |

For further details, visit our website: **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :** The Add'l Executive Engineer, (O): Phone No. 022-2746 5410.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Panvel**





**यश हॉस्पिटल**

**जाहीर सुचना**

यश हॉस्पिटल, त्रिमूर्ती आर्केड, पहिला मजला, उरण नाका, पनवेल सूचित करत आहे की, हॉस्पिटलचे ०१ जानेवारी २००७ ते ३१ डिसेंबर २०१७ पर्यंतचे सर्व रेकॉर्ड नष्ट करण्यात येणार आहेत.

तरी कोणास हे रेकॉर्डस हवे असल्यास पुढील ३० दिवसांच्या आत हॉस्पिटल प्रशासनाशी खालील नंबर वर संपर्क साधावा

**सही/-**
यश हॉस्पिटल प्रशासन
०२२/२७४५८९७५/
९८१९८६५८६६/९९८७८४९६३९

पत्ता :- पहिला मजला , त्रिमूर्ती आर्केड , उरण नाका, फिश मार्केट समोर, पनवेल-४१०२०६. मो. २७४५८९७५



**ग्रुप ग्रामपंचायत लोधिवली**
लोधिवली,ता. खालापूर, जि. रायगड

**साहित्य खरेदी व विकास कामे जाहिरात**

ग्रामपंचायत लोधिवली हद्दीतील ग्रामनिधी अंतर्गत सन २०२२-२३ या वर्षाच्या करिता खालील प्रमाणे विकासकामे व साहित्य खरेदी करावयाची आहे. त्याकरिता ग्रामपंचायत हद्दीतील अधिकृत / अनुभवी ठेकेदारांकडून सिलबंद निविदा/दरपत्रके मागविण्यात येत आहे. सदर कामांच्या कोऱ्या निविदा / दरपत्रके मिळण्याकरिता अर्जाची तारीख दि. १६/०२/२०२३ ते दि. २४/०२/२०२३ पर्यंत या दिवशी कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात मिळतील.

सदर निविदा/दरपत्रके दि. २४/०२/२०२३ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील. सदर निविदा/दरपत्रके त्याच दिवशी किंवा ग्रामपंचायत ठरवेल त्या दिवशी कार्यालयीन वेळेत उघडण्यात येतील. कामांकरिता लागणारी इसारा रक्कम ग्रामपंचायत लोधिवली यांच्या नावाने डिमांड ड्राफ्टच्या द्वारे / रोखीने स्वीकारण्यात येतील. कोणतीही एक निविदा मंजूर करणे अगर नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव व योजना नाव | निधी | अ. रक्कम | निविदा फी | इसारा रक्कम | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे वरोसे येथे साई बेलोसे यांच्या घराशेजारी मोरी टाकणे. | ग्रामनिधी २०२२-२३ | ६०००० | ५०० | १% | ६ म. |
| २ | मौजे नढाळ पांडुरंग मालुसरे यांच्या घरापासून ते मुख्य रस्त्यापर्यंत आर.सी.सी. गटार बांधणे. | १५ वा वित्त आयोग (बंधित निधी) सन २०२१-२२ व ग्रामनिधी २०२२-२३ | ४००००० + २५०००० ६५०००० | ५०० | १% | ६ म. |
| ३ | ग्रामपंचायतीसाठी सिमेंट बाकडे खरेदी करणे. | १५ वा वित्त आयोग सन २०२०-२१ व अबंधित निधी | १००००० | - | - | - |
| ४ | ग्रामपंचायत हद्दीतील सर्व अंगणवाडीसाठी धान्य कोठ्या खरेदी करणे. | १५ वा वित्त आयोग सन २०२१-२२ व अबंधित निधी | ३५००० | - | - | - |

टीप:-
१) निविदा/दरपत्रके भरणाऱ्या सर्व कंत्राटदारांनी दि. १६/०२/२०२३ ते दि.२४/०२/२०२३ रोजी दुपारी ०१.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालय लोधिवली येथे सिलबंद लिफाफा जमा करणे बंधनकारक आहे.
२) निविदा/दरपत्रके भरताना आपले दर जी. एस. टी. वगळून भरणे बंधनकारक आहे. जी. एस. टी. चे दर संबंधित विभागाचे नियमाप्रमाणे लागू राहतील.
३) कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा/दरपत्रके नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.
४) मुदतीनंतर आलेल्या खाडाखोड करून साक्षांकित न केलेल्या व अटीशर्तीयुक्त निविदा/दरपत्रके स्वीकारल्या जाणार नाहीत.
५) सदर कामांच्या निविदा/दरपत्रके अंदाजपत्रक निविदा / दरपत्रके व अटी शर्ती बाबत कार्यालयात निविदा/दरपत्रके धारकास माहितीपत्रक देण्यात येईल. ..
६) कोणत्याही नामंजूर निविदासंदर्भात निविदा/दरपत्रके धारकास कोणत्याही प्रकारे लेखी स्वरुपात कळविले जाणार नाही.
७) ठेकेदार ग्रामपंचायतीचा येणे बाकीदार असल्यास निविदा/दरपत्रके रद्द करण्यात येईल.

**सही/-**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत लोधिवली**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत लोधिवली**



**ग्रुप ग्रामपंचायत उसरोली, कार्यालय**
ता. मुरूड, जि. रायगड फोन नं :- ०२१४४-२५२०८९

**निविदा सुचना**

ग्रुप ग्राम पंचायत उसरोली करीता मासिक सभा दि. १५/०२/२०२३ ठराव क्रमांक ६६१ अन्वये १५ वा वित्त आयोग / ग्रामनिधी योजने अंतर्गत मंजूर खालील कामांकरीता जास्तीत जास्त नोंदणीकृत पोट ठेकेदार नेमणे आहे. तरी नोंदणीकृत इच्छूक ठेकेदारांकडून लिफाफा पध्दतीने मोहरबंद निविदा दिनांक १६/०२/२०२३ पासून मागविण्यात येत आहेत.

| अ. नं. | कामाचे नाव | योजनेचे नावं | अंदाजपत्रकिय रक्कम | इसारा रक्कम | निविदा किंमत | निविदा स्विकारण्याची अंतिम तारीख | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | उसरोली तलावाचा गाळ काढणे व दुरुस्त करणे | १५ वित्त आयोग | ८०१३४१ | ८०१३ | १०० | २४/०२/२०२३ सायं ५ पर्यंत | ६ महिने |
| २ | ग्रा प हद्दीत उर्वरीत पोलवर एल.ई. डी स्ट्रीट लाईट बसविणे | १५ वित्त आयोग | ४९९९०० | ४९९९ | १०० | २४/०२/२०२३ सायं ५ पर्यंत | ६ महिने |
| ३ | वाळवटी आदीवाशीवाडी येथे पाईप लाईप लाईन टाकून नळ कनेक्शन देणे | १५ वित्त आयोग | १००००० | १००० | १०० | २४/०२/२०२३ सायं ५ पर्यंत | ६ महिने |
| ४ | ग्रा पं हद्दीत घर तेथे नळ जोडणी पाईप लाईन टाकणे | १५ वित्त आयोग | १६६६३३ | १६६६ | १०० | २४/०२/२०२३ सायं ५ पर्यंत | ६ महिने |
| ५ | सुमरादेवी आदिवासीवाडी येथे पाईप लाईन टाकून नळ कनेक्शन देणे | १५ वित्त आयोग | १२२१७९ | १२२२ | १०० | २४/०२/२०२३ सायं ५ पर्यंत | ६ महिने |
| ६ | ग्रा प हद्दीतील सर्व गावांमध्ये साफसफाई करणे | ग्रामनिधी | ५०००० | ५०० | १०० | २४/०२/२०२३ सायं ५ पर्यंत | ६ महिने |

**अटी व शर्ती :**
१) महाराष्ट्र शासन / राजिप अलिबाग बांधकाम, यांजकडील शासन निर्णय, परीपत्रक, लेखासंहीता सर्व नियम व अटी यांचे तंतोतंत पालन तसेच प्रशासकीय व तांत्रीक मंजुरीतील सर्व नियमांना अधिन राहून कामे पुर्ण करावी लागतील.
२) सदर कामाचे अंदाजपत्रक कार्यालयीन वेळेत पाहण्यास मिळेल. रु. २०/- फी भरल्यास अंदाजपत्रकाची प्रत देण्यात येईल.
३) शासन निर्णयानुसार जी. एस. टी. आयकर व आवश्यक सर्व रकमा देय बिलातून कपात केल्या जातील.
४) निविदा कंत्राटदार नोंदणीकृत पाहीजे. न मिळाल्यास अनुभवी स्थानिक ग्रामस्थांचा विचार केला जाईल. निविदा सोबत ठेकेदाराने नोंदणीची सत्यप्रत जोडावी व प्रत्येक कामासाठी स्वतंत्र निविदा भरण्यात यावी.
५) सोबत कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्र, आधारकार्ड / पॅनकार्ड झेरॉक्स साक्षांकीत प्रति जोडण्यात यावे.
६) निविदा मंजूर केल्यावर ५००/- करारनामा, कामाचे पुर्वीचे व पूर्ण झाल्याचे फोटो सादर करावे लागतील.
७) मंजूर काम पंचायत समिती मुरुड यांजकडील तांत्रिक अधिकारी यांचे मार्गदर्शन ग्रामपंचायत उसरोली यांच्या देखरेखी खाली कामे करण्याचे आहे.
८) एक किंवा सर्व निविदा अर्ज मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार ग्रुप ग्रामपंचायत उसरोली यांजकडे राहिल.
९) सुरक्षा अनामत रकमेपैकी १% रक्कम कार्यारंभ आदेश देण्यापूर्वी भरावी लागेल व उर्वरीत रक्कम देयकातून कपात करण्यात येईल.
१०) सदर निविदा दिनांक २७/०२/२०२३ सकाळी / दुपारी ११:३० वाजता ग्रां. पं सरपंच /सदस्य यांचे समक्ष उघडण्यात येईल.

**सही/-**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत उसरोली**
**मु.पो. उसरोली, ता. मुरुड**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत उसरोली**
**मु.पो. उसरोली, ता. मुरुड**

# शिरवणेत अनधिकृत फेरीवाल्यांचा विळखा

## बांधकाम साहित्य फुटपाथवर; नागरिक त्रस्त

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

शिरवणे गावातील मुख्य रस्त्याच्या दुतर्फा अनधिकृत फेरीवाल्यांची बस्तान मांडले आहे. दुचाकी व चारचाकी वाहनांची समस्या तर जैसे थे आहे. त्यातच गावातील मुख्य रस्त्याच्या लगत चालू असणाऱ्या घरांच्या बांधकांमाचे साहित्य संबंधित ठेकेदाराने चक्क फुटपाथवर ठेवल्याने अरुंद रस्ता असलेल्या शिरवणे गावात वाहतूक कोंडी होत आहे. त्याचबरोबर नागरिकांना चालणे मुश्कील झाले आहे.

शिरवणे गावातील मुख्य मार्गाच्या लगत असणाऱ्या तीन इमारतीच्या पुनर्बांधणीचे काम सध्या जोरात सुरू आहे, मात्र बांधकाम करीत असताना बांधकाम साहित्य संबंधित ठेकेदाराने चक्क पदपथावर ठेवले असून पादचाऱ्यांना ये-जा करण्यास मुश्कील झाले आहे. गावातील हा मुख्य मार्ग अगोदरच अरुंद असल्याने गर्दीच्या वेळेस मोठ्या वाहनांना मार्गक्रमण करणे जिकिरीचे होत असून मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे.

शिरवणेगाव ठाणे-बेलापूरपट्टीतील महत्त्वाचे गावे असून येथे मोठी बाजारपेठ आहे. रविवारच्या बाजारपेठेत खरेदी करण्यासाठी लाबवरून नागरिक येत असतात. या गावातील मध्यभागी मुख्य रस्त्यालगत इमारतीच्या पुनर्बांधणीचे काम जोरात सुरू आहेत, मात्र सदर बांधकाम करताना संबंधित ठेकेदाराने बांधकाम साहित्य चक्क जवळीक फुटपाथवर ठेवले असल्याचे दिसत आहे.



शिरवणे गावातून बेलापूरच्या दिशेने जाणार मुख्य मार्गावर दोन्ही बाजूस दुकाने आहेत तसेच रस्त्यावर फेरीवाल्यांचे बस्तान असते. दुचाकी आणि चारचाकी गाड्या येथे पार्क केलेल्या आढळतात. ही मुख्य बाजारपेठ असल्याने सकाळी व संध्याकाळी खरेदीसाठी नागरिकांची मोठी गर्दी असते. येथील रस्ता अरुंद असल्याने अशातून मार्ग काढत ये-जा करताना दुचाकी आणि चारचाकी वाहन तसेच नवी मुंबई मनपा परिवहनच्या वाशीहून बेलापूरच्या दिशेला जाणाऱ्या बस मार्ग क्र २१ च्या वाहनचालकांना मार्गक्रमण करताना मोठी तारेवरची कसरत करावी लागते. या मार्गावर मोठ्या प्रमाणावर बिअर बार आणि लेडीज बार असून येथे येणाऱ्या ग्राहकाची वाहने सायंकाळी ७ पासून रात्री ११पर्यंत रस्त्यावर उभी होत असल्याने स्थानिक दुकानदार आणि ग्राहकांमध्ये भांडणे नित्याचीच झाली आहे.

> अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करणे सुरूच असते. संबंधित ठेकेदाराने बांधकाम साहित्य फुटपाथवर टाकले असेल, तर त्वरित कारवाई करण्याचे आदेश देतो.
>
> -सुनील पाटील,
> नेरूळ विभाग अधिकारी

# तुर्भे येथे पदपथांची अतिक्रमणांपासून मुक्ती

## एपीएमसी वाहतूक विभागाची कारवाई

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

आशिया खंडातील सर्वांत मोठी बाजारपेठ असलेल्या तुर्भे आणि एपीएमसी परिसरात वाहतूक कोंडीची समस्या उद्भवत आहे. या परिसरातील पदपथांवर अनेक गॅरेज चालकांनी अतिक्रमण केले आहे. काही ठिकाणी वाहनांचे बेकायदा पार्किंग केले जात असल्याने पादचाऱ्यांना अडथळ्यांची शर्यत पार करावी लागत होती. रहदारीस अडथळा ठरणाऱ्या वाहनांवर एपीएमसी वाहतूक विभागाने कारवाई केली आहे.

तुर्भे येथील दक्षिणमुखी हनुमान मंदिर ते कांदा-बटाटा मार्केट गेट क्रमांक १ पर्यंतच्या पदपथावर नेहमीच दुचाकींची पार्किंग केली जात आहे. तसेच अन्नपूर्णा बिल्डिंग ते कांदा-बटाटा मार्केट गेट क्रमांक १ पर्यंत फेरीवाल्यांनी पदपथ बळकावला आहे. वाशी-तुर्भे लिंक रोडलगत आय.सी.एल. शाळा ते एपीएमसी सिग्नलपर्यंत चारचाकी दुरुस्तीची गॅरेज चालू केली आहेत. यामुळे तुर्भेहून वाशीकडे जाणाऱ्या मार्गावरील एक मार्गिका पूर्णपणे गॅरेजवर दुरुस्ती करण्यासाठी आलेल्या रिक्षा, तसेच दुचाकी यांनी व्यापलेली असते. परिणामी, या परिसरात नेहमीच वाहतूक कोंडी पाहायला मिळते.

> एपीएमसी परिसरात अरुंद रस्ते असल्याने येथे काही अनुचित प्रकार घडल्यास रुग्णवाहिका, अग्निशमन दल, तसेच अन्य आपत्कालीन वाहने यांना अडथळा होऊ नये या विषयी स्थानिक दुकानदार आणि रहिवासी यांचे प्रबोधन केले जात आहे. तसेच पदपथांवर होणाऱ्या अतिक्रमणावरही कारवाई केली जाणार आहे.
>
> -विमल बिडवे, पोलीस निरीक्षक,
> वाहतूक विभाग, एपीएमसी

तुर्भे गाव, एपीएमसी जलाराम मार्केट, तुर्भे नाका जनता मार्केट येथेही अशीच परिस्थिती होत आहे. त्यामुळे एपीएमसी वाहतूक पोलीस शाखेच्या निरीक्षक विमल बिडवे यांनी पदपथांवरील बेकायदा पार्किंग, वाहनदुरुस्ती करणाऱ्यांविरोधात धडक कारवाईची मोहीम हाती घेतली आहे. त्यानुसार संबंधित १५ गॅरेज मालकांवर मुंबई पोलीस कायदा कलम १०२ प्रमाणे कारवाई करण्यात आली. तसेच याप्रकरणी आता न्यायालयात उपस्थित राहून दंड भरावा लागणार आहे.

दरम्यान, एपीएमसी वाहतूक विभागाच्या वतीने वेळोवेळी अतिक्रमण करणाऱ्यींवर कारवाईचा बडगा उगारला जातो. त्यामुळे येथील रहदारी सुरळीत होते.

# विद्यार्थ्यांनी घेतले स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण

## पोक्सो कायद्याविषयीही मार्गदर्शन

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

कळंबोली येथील एमईएस पब्लिक स्कूलच्या मुख्याध्यापिका मिनाक्षी जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे सहकारी शिक्षक केशर जाधव, भास्कर भाविक, रमेश पाटील यांनी विद्यार्थ्यांकरीता स्वसंरक्षण प्रशिक्षण व पोक्सो कायदा प्रशिक्षण या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.



या कार्यक्रमासाठी पोलीस निरीक्षक दिलीप गुजर, उप पोलीस निरीक्षक सुशांत दुडे तसेच इंडियन मार्शल आर्ट्स शितो - रियो फेडरेशनचे उपाध्यक्ष, फोर्थ डॅन ब्लॅक बेल्ट, राष्ट्रीय पंच व पत्रकार उत्कर्ष समिती महाराष्ट्र खजिनदार शैलेश ठाकूर, सेकंद डॅन ब्लॅक बेल्ट, राष्ट्रीय पंच, नॅशनल मेडलिस्ट सानिका ठाकूर यांची उपस्थिती होती. शाळेच्या शिक्षक वृंदा करून आलेल्या पाहुण्यांचा आपल्या संस्कृतीचा पावित्र राखणार तुळशीचे रोपटे देऊन सन्मान करण्यात आला. गुजर व दुडे यांनी बाल अत्याचाराविषयी निघालेल्या पोक्सो कायद्यासंबंधित विशेष माहिती देऊन मुलांना जागृत केले. व जर कोणावर अन्याय होत असेल तर त्याला मदत करण्याचे आश्वासन दिले.

शैलेश ठाकूर व सानिका ठाकूर यांनी जर आपल्यावर अतिप्रसंग आला तर त्याच्यापासून आपण बचाव कसा करू शकतो याविषयी खूप चांगल्या प्रकारे माहिती देऊन त्याप्रमाणे प्रात्यक्षिक करून दाखवले. या कार्यक्रमासाठी उपस्थित राहिलेल्या पाहुण्यांचे शाळेकडून आभार मानण्यात आले.

# विंधणे कातकरवाडीत स्वच्छता अभियान

**उरण : वार्ताहर**

कोकण विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर, जिल्हाधिकारी रायगड डॉ. योगेश म्हसे, उप विभागीय अधिकारी राहुल मुंडके, प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरराव, तहसीलदार उरण भाऊसाहेब अंधारे यांच्या मार्गदर्शनाखाली कातकरी उत्थान सप्त सूत्री कार्यक्रमांतर्गत रविवारी (दि. १२) उरण तालुक्यातील विंधणे कातकरी वाडीत उरण सामाजिक संस्थेच्या माध्यमातून सफाई अभियान राबविण्यात आले.

हे सफाई अभियान प्रथम टप्प्यात उरण तालुक्यातील सर्व वाड्यांनंतर रायगड जिल्ह्यातील इतर तालुक्यात राबविणार आहोत. या अभियानाची संकल्पना सामजिक कार्यकर्ते नामदेव ठाकूर, सुनील जोशी, रायगड भूषण दत्ता गोंधळी, मनीष कातकरी यांची आहे. या सफाई अभियानाची प्रा. राजेंद्र मढवी यांनी रूपरेषा आखली आणि गोपाळ पाटील यांनी मार्गदर्शन केले तसेच वाडीवरील सर्व आदिवासी महिलांनी उत्स्फूर्त मेहनत घेतली आणि सर्व परिसर स्वच्छ केला. सफाई अभियानास सहकार्य करनाऱ्या सर्वांचे आभार मानले.



# पनवेलच्या रामदास मारुती मंदिरात दासनवमी उत्सव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रामदास मारुती मंदिर, पनवेल येथे दासनवमी उत्सवाच्या निमित्ताने समाधीन प्रस्तुत कैवल्याच्या चांदण्याला अभंग व नाट्यगीत गायनाचा कार्यक्रम झाला. यामध्ये धनंजय म्हसकर व अनुराधा दातार यांनी आपल्या सुमधूर गायनाने रसिकांना मंत्रमुग्ध केले.

कार्यक्रमाचा प्रारंभ करताना धनंजय म्हसकर यांनी 'रामधून' सादर करून वातावरण भक्तिमय केले. त्यानंतर अनुराधा दातार यांनी 'राम का गुनगान' हे हिन्दी भजन सादर केले. यानंतर विविध अभंग, रामभक्तीपर गीते, भक्तीगीते व नाट्यपदांचे सादरीकरण या गायकानी केले.

अथर्व देव यानी संवादिनी, आदित्य उपाध्ये यानी तबला मंगेश साळुंखे यानी पखवाज, मंदार तांडेल यानी बासरी आणि समीर कर्वे यांनी विविध तालवाद्यांची साथ केली. प्रसिद्ध निवेदक समीर खरे यांनी आपल्या बहारदार शैलीतील अभ्यासपूर्ण निवेदनाने कार्यक्रमाची उंची वाढवली.



# बेंजो वादक चित्राक्ष घरतचा सन्मान

## चाईल्ड केअर सामाजिक संस्थेकडून पुरस्कार

**उरण : बातमीदार**

चाईल्ड केअर सामाजिक संस्था उरण रायगड तर्फे उरण तालुक्यातील सुप्रसिद्ध लहान वयातील बेंजो वादक म्हणून चित्राक्ष स्वप्निल घरत (वय सहा वर्षे) भेंडखळ, उरण याचा उरण विशेष सन्मान पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. उरण तालुक्यातील पत्रकार विठ्ठल ममताबादे यांच्या हस्ते पुरस्कार देऊन चित्राक्ष घरत यांना सन्मानित करण्यात आला.



चित्राक्ष घरत हा वयाच्या तीन ते चार वर्षांपूर्वी सहज घरात बँड वाजवण्याची आवड निर्माण झाली. त्यातूनच त्याने व्यावसायिक बँड मध्ये त्याने वादन केले असता त्याचे वादन मोठ्या प्रमाणात सर्वांना आवडले. याचाच धागा पकडून मुंबई येथील सुप्रसिद्ध बँजो पथकाने त्याच्या व्हिडिओ आपल्या युट्युब तसेच इंस्टाग्रामला पोस्ट केल्या होत्या त्या पोस्टला लाखाच्या वर लाईक मिळालेल्या आहेत. आज चित्राक्ष हा उत्कृष्ट ढोलकी तसेच पखवाज वाजवत आहे, परंतु क्लासिकल शिक्षण मिळावे यासाठी क्लासिकल पखवाजचे शिक्षण तुषार घरत यांच्याकडे शिक्षण घेत आहे.

सन्मानावेळी चित्राक्षचे वडील स्वप्नील घरत, चित्राक्षची आई अक्षया घरत, काका सतिष घरत, आजी शारदा घरत, शैलेंद्र घरत, यशवंत म्हात्रे, प्रदीप ठाकूर, नक्ष घरत तसेच संस्थेतर्फे संस्थापक अध्यक्ष विकास कडू, चाईल्ड केअर संस्थेचे मीडिया सल्लागार विठ्ठल ममताबादे, कार्याध्यक्ष मनोज ठाकूर, उपाध्यक्ष तुषार ठाकूर, उपाध्यक्ष हितिक पाटील, खजिनदार राजेश ठाकूर, सहसचिव उद्धव कोळी, सहखजिनदार रोशन घरत, सदस्य रोशन धुमाळ आदी उपस्थित होते.

# अवयवदानाबाबत नवी मुंबईत जनजागृती

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई येथील अपोलो हॉस्पिटल्स या व्हॅलेंटाईन डे 'प्रेमाची अद्वितीय भेट' असा आशयाचा कार्यक्रम झाला. आपल्या प्रियजनांचे जीवन वाचवण्यासाठी आपल्या शरीराचा भाग दान करण्यापेक्षा कोणती मोठी भेटवस्तू असू शकते, अशी परंपरा निर्माण करण्यासाठी अवयव दाता आणि प्राप्तकर्त्यांमध्ये प्रेम, काळजी आणि विश्वासाचे वातावरण निर्माण करणे हा उद्देश ठेवून कार्यक्रम झाला.

अवयवदान जनजागृती करण्यासाठी १३ अवयवदाते जोडपी एकत्रित आली. नवी मुंबईतील अपोलो हॉस्पिटल्सचे डॉक्टर्स आणि नर्सेस यांनी अवयवदाते आणि प्राप्तकर्त्यांसोबत 'व्हॅलेंटाईन डे' साजरा केला. या वेळी अपोलो हॉस्पिटल्सचे पश्चिमी क्षेत्राचे प्रादेशिक-सीईओ संतोष मराठे म्हणाले की, अवयवदाते आणि प्राप्तकर्त्यांना एकत्र आणून, आम्ही केवळ त्यांच्या निःस्वार्थ कृत्यांचा उत्सवच साजरा करत नाही तर अवयवदानाच्या प्रभावाविषयी जनजागृती करत आहोत आणि इतरांना सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी प्रेरणा देत आहोत.




# खारघरमधील तरुण प्राचीन भाषेच्या प्रेमात

**खारघर : प्रतिनिधी**

प्राचीन इजिप्तची संस्कृती नेहमी लोकांना गूढ वाटत आली आहे. इजिप्तप्रमाणे तितकीच प्राचीन असलेली सुमेरियन संस्कृती जी आजच्या इराक-सीरिया परिसरात साधारण ४५०० वर्षांपूर्वी विकसित झाली होती आणि जिच्यासोबत आपल्या सिंधू-संस्कृती म्हणजेच हडप्पन संस्कृतीचा व्यापारी संबंध राहिला आहे, यांच्याबाबत निरनिराळ्या माहितीपटांमुळे कुतूहल असते. या दोन्ही अतिप्राचीन भाषा खारघर शहरातील शैलेश क्षीरसागर हा इतिहासाचा अभ्यासक असलेला तरुण शिकत आहे. फावल्या वेळेत क्षीरसागर आपली आवड जोपासण्याचा प्रयत्न करत आहे.

इजिप्शियन भाषांतील ओल्ड इजिप्शियन (इसपू ३३०० सुमार), मिडल इजिप्शियन (इसपू २५०० ते इसपू १३०० सुमार) आणि लेट इजिप्शियन (इसपू १३०० ते इसपू ७०० सुमार) यानंतर ख्रिश्चन धर्म-प्रसारामुळे इजिप्तमध्ये चर्च आल्यानंतर इसवी सनाच्या पहिल्या शतकात लेट इजिप्शियनपासून कॉप्टिक नामक भाषा विकसित झाली, ज्याची लिपी ग्रीकप्रमाणे होती. इजिप्तमधील एका प्राचीन शिलालेखात इराणमधील राजा दारियसच्या राज्यात असलेल्या सिंध प्रांताचा उल्लेख हिंदुश असा आहे, हा तेथील भारताचा थेट उल्लेख आहे. ह्या भाषांच्या अभ्यासामुळे पिरॅमिड्सबाबत



तसेच या संस्कृतीबाबत आणि प्राचीन इजिप्तमधील ३००० वर्षांहूनही जुन्या साहित्यातील मनोरंजक कथा वाचून त्यांचे आपल्या भाषांत भाषांतर करणे सहज शक्य होईल.

शैलेश क्षीरसागर यांनी यापुर्वी ओल्ड पर्शियन ही भाषादेखील आत्मसात केली आहे. शैलेशच्या या आवडीमागे भारतात या भाषेचा प्रचार व प्रसार हा एक उद्देश आहे. भारतात हाताच्या बोटावर मोजण्या एवढे तरुण ही भाषा शिकत आहेत. आजकाल व्हॉट्सअॅपच्या काळात या प्राचीन संस्कृतींबाबत अनेक गैरसमज पसरविले जात आहेत. या संस्कृती परग्रहवासीयांनी निर्माण केल्या किंवा इराकमधील प्राचीन सुमेरियन वीरांना भारतातील देवता म्हणून सांगणे अशी चुकीची माहिती लोकांत पसरविली जाऊन लोकांची दिशाभूल केली जात आहे. यामुळे आपल्या लोकांबाबत जागतिक पातळीवर चुकीचा संदेश जातो. हे सर्व थांबविण्यासाठी ह्या लिप्या आणि भाषा अगदी मूळ शिलालेखांतून शिकणे आणि त्याचा खरा अर्थ लोकांना सोप्या भाषांत समजावून सांगणे हा प्रयत्न होणे गरजेचे असल्याने याकरिता शैलेश ही भाषा शिकत आहेत. सध्या प्राचीन इजिप्शियन अमेरिकेतील ऑरिलियो नावाच्या शिक्षकाकडून आणि सुमेरियन भाषा गॅब्रियल ह्या इटालियन शिक्षकाकडून शिकत आहे.

शैलेश याने यशवंतराव चव्हाण विद्यापीठातून इतिहास विषयात पदवी प्राप्त केली आहे. पुरातत्व विषयातही त्यांनी शिक्षण घेतले आहे.

# उपवासाच्या पदार्थांची दरवाढ

**नवी मुंबई : बातमीदार**

दररोजच्या वापरातील जीवनावश्यक वस्तूंच्या किमती वाढल्या असताना आता उपवासाच्या वस्तूही मोठ्या प्रमाणात महागल्या आहेत. शेंगदाणे, साबुदाणा, भगर, राजगिरा आदी वस्तूंच्या दरात सरासरी १५ ते २० टक्क्यांनी वाढ झाली आहे. त्यामुळे महाशिवरात्रीचा उपवास यंदा अधिक खर्चिक ठरणार आहे. उपवासानिमित्त शेंगदाणे, साबुदाणा, भगर यासह उपवासाच्या तयार पिठाला मागणी आहे.

वाढलेल्या किमतींमुळे ग्राहकांना महागाईचा फटका बसत आहे. सध्या साबुदाणा प्रती किलो ७० रुपये, शेंगदाणे १२२ ते १२६ रुपये किलो तर भगरचे भाव किलोमागे ११४ रुपये आहे. महाशिवरात्रीला साबुदाणा, शेंगदाणा, भगर, गूळ, साखर, पेंडखजूरला मोठ्या प्रमाणात मागणी असते.

साबुदाण्याची मागणी लक्षात घेता व्यापाऱ्यांनी साठेबाजी सुरू केल्यामुळे दरवाढ झाली आहे. उपवासाचे पदार्थ बनविण्यासाठी लागणाऱ्या सर्वच वस्तू महागल्या आहेत. शिवाय फळांचे दरही वधारलेले असल्याने उपवासातही काय खावे असा प्रश्न पडतो. सर्वसामान्यांना अन्नपदार्थांवरील दरवाढ परवडत नसल्याने त्यांच्यापुढे बऱ्याच समस्या निर्माण होतात.

आता दोन दिवसांवर महाशिवरात्री आली असताना हिंदू धर्मात महाशिवरात्रीचा उपवास प्रत्येक जण ठेवतो. त्यामुळे शक्यतो घरात अन्न शिजवले जात नाही. त्यादिवशी फराळच केला जातो, मात्र महागाईमुळे उपवासही महागले आहेत. यात उपवासाचे पदार्थ बनविण्यासाठी लागणाऱ्या वस्तूंचे दर वधारले असतानाच फळेही १०० रुपयांच्या वरच आहेत. यामुळे उपवासाचे पदार्थ परवडणारे नसतानाच फळेही आवाक्याबाहेरची आहेत. तर रेडिमेड फराळावर १५ ते २० टक्के भाव वाढ झाली आहे.

# मुरूड बेली आदिवासीवाडीला विजेची प्रतीक्षा

## जिल्हा परिषद शाळेतही पसरलाय अंधार; विद्यार्थ्यांची परवड

**मुरूड : प्रतिनिधी**

एकीकडे भारत देश स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी वर्ष साजरा करीत असला, तरी अद्यापही आदिवासी बांधव आजही पाणी, रस्ते, वीज आदी मूलभूत सुविधांपासून वंचित राहिला आहे. उसरोली ग्रामपंचायत हद्दीतील बेलीवाडी आदिवासी वाडीवर अद्यापही विजेची व्यवस्था नसल्याने येथील बांधवांना अंधारात धडपड करावी लागत आहे.

उसरोली ग्रामपंचायतीपासून दोन किमी अंतरावर डोंगराळ भागातील बेली आदिवासी समाज अनेक वर्षे वास्तव करीत आहे, परंतु प्रकाशासाठी सध्या त्यांना झगडावे लागत आहे. जिल्हा परिषद शाळेसाठी व ११ घरांना अजूनपर्यंत वीज उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांचेही मोठे नुकसान होत आहे.



येथील आदिवासी बांधव रोजच्या रोज उदरनिर्वाहासाठी मजगांव, नांदगाव, उसरोली याठिकाणी जात असतात, परंतु सायंकाळच्या वेळी वाडीत अंधाराचे साम्राज्य पसरलेले दिसते.

आज २१व्या शतकातसुद्धा येथील विद्यार्थ्यांना अंधारातच अभ्यास करून आपल्या भविष्याची स्वप्ने पहावी लागत आहेत. त्यामुळे शासनाने तत्काळ बेली आदिवासीवाडीवर विजेची व्यवस्था उपलब्ध करून द्यावी व आमच्या मुलांचे भविष्य प्रकाशमय करावे, अशी मागणी स्थानिक आदिवासी बांधवांकडून करण्यात येत आहे.

> **ग्रामपंचायतीमधून विजेच्या खर्चाकरिता निधी येत नाही. तो खर्च प्रत्येकाचा असतो. तरीपण आम्ही दानशूर व्यक्तींशी चर्चा करून या ठिकाणी विजेचा पोल बसविण्याचा प्रयत्न करू.**
>
> –मनिष नांदगावकर, सरपंच, उसरोली

> **बेलीवाडीचा सर्व्हे केला आहे. येत्या तीन महिन्यांच्या आसपास येथे विद्युत पोल बसवून वीजपुरवठा सुरू करण्यात येईल. हा प्रस्ताव डिपीडीसी जिल्हा नियोजन निधीतून मंजुरीसाठी रोहा महावितरण विभाकडे पाठविला आहे.**
>
> –महादेव दातीर, उपकार्यकारी अभियंता, महावितरण



**रोहा : भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी सामाजिक कार्यकर्ते रोशन चाफेकर व शिवानी यांच्यासह रोठ बुद्रुक येथील तुकाराम वारंगे यांची कन्या अंकिता वारंगे त्याचप्रमाणे कुमार कोल्हटकर व निलेश म्हसकर यांच्या विवाह सोहळ्यास भेट देत शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप दक्षिण जिल्हा युवा मोर्चा अध्यक्ष अमित घाग, भाजप जिल्हा उपाध्यक्ष राजेश मापारा, सरचिटणीस मिलिंद पाटील, तालुकाध्यक्ष सोपान जांभेकर उपस्थित होते.**

# अंजुमन इस्लाम कॉलजेमध्ये महारक्तदान शिबिर

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड येथे अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स मुरूड जंजिरा व सिद्दी जफर शेखानी मेमोरियल टेक्निकल इन्स्टिटय़ूट (आयटीआय) यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी (दि. १४) महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



रक्तसंकलन करण्यासाठी शासकीय रक्तपेढी, जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग यांना प्राचारण करण्यात आले होते. डॉ. दीपक गोसावी, रक्तसंकलन अधिकारी हे आपल्या टीमसह उपस्थित होते. महाविद्यालयातर्फे सर्व उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. या शिबिरादरम्यान ६० रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान केले. विशेष म्हणजे यामध्ये १० महिलांचा सहभाग आहे. या शिबिरादरम्यान महाविद्यालयाचे चेअरमन जैनुद्दीन कादरी, व्यवस्थापन समितीचे इम्रान मलिक व इस्माईल शेख उपथित होते.

या शिबिरासाठी दोन्ही महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. साजिद शेख व इश्तियाक घलटे यांनी विशेष प्रयत्न केले. महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. नितीन पवार, प्रा. अल्ताफ फकीर, प्रा. समीक्षा माळी व ग्रंथपाल अंजुम दाखवे यांनी माळी रुतिका, घाग मयूर, मोरे प्रतीक्षा, गुप्ता दिवेश, डावरे वाहीब, लसने अरफात, लांबाते कैफ, पठाण झिशान, म्हसाळकर विशाखा, आगरकर वेदिका, भगत रिद्धी, ठाकूर रिया या विद्यार्थ्यांसह अथक परिश्रम घेतले.

# विद्यार्थ्यांसाठी सर्प, निसर्गासोबत सहजीवनावर कार्यशाळा

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

शहरातील जेएसएम महाविद्यालय येथे वाईल्ड लाईफ वॉरियर्स ऑफ अलिबागतर्फे विद्यार्थ्यांसाठी सर्प आणि निसर्गासोबत सहजीवन या विषयावर शनिवारी कार्यशाळा झाली.

या कार्यशाळेत सापांबद्दल शास्त्रीय माहिती, अलिबाग आणि भोवतालच्या परिसरात आढळणारे साप तसेच सर्पदंश कसे टाळावेत आणि सर्पदंश झाल्यास करावयाच्या उपाययोजना याबाबतचे सविस्तर विश्लेषण करण्यात आले.

या वेळी डॉ. प्रसाद दाभोळकर, ओमकार कामतेकर आणि अदिती सगर यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे याबाबतची माहिती उपस्थितांना दिली. वाईल्ड लाईफ वॉरियर्स ऑफ अलिबाग ही संस्था गेल्या अनेक वर्षांपासून अलिबाग तालुक्यात वन्यजीव विशेषतः साप, पक्षी यांचा बचाव तसेच प्रथमोपचार करण्याचे सेवाभावी कार्य करत आहे.



जेएसएम महाविद्यालयाचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील, मुख्याध्यापक डॉ. अनिल पाटील, उपमुख्याध्यापिका डॉ. सोनल पाटील, जीवशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. अद्वैत घाटपांडे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. सुनील आनंद, डॉ. मीनल पाटील तसेच वाईल्ड लाईफ वॉरियर्स ऑफ अलिबागचे सक्रिय कार्यकर्ते पारस घरत, सुजित लाड आणि समीर पालकर हे उपस्थित होते.

# पेण एज्युकेशन सोसायटीचा आदर्श शैक्षणिक संस्था म्हणून गौरव

**पेण : प्रतिनिधी**

तालुक्यातील पेण एज्युकेशन सोसायटी या संस्थेला दै. जीवनदीप वार्ताच्या वतीने आदर्श शैक्षणिक संस्था पुरस्काराने सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले. संस्थेच्या वतीने अध्यक्ष मंगेश नेने, कार्याध्यक्ष प्रशांत ओक यांनी पुरस्कार स्वीकारला.



या पुरस्कार सन्मान सोहळ्याला कोकण शिक्षक मतदारसंघाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, मुरबाड विधानसभाचे आमदार किसन कथोरे, कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार निरंजन डावखरे, दै. जीवनदीप वार्ताचे मुख्य संपादक तथा जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष रवींद्र घोडविंदे, कार्यकारी संपादक विजय यादव यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. ११२ वर्षांची परंपरा असलेल्या व दर्जेदार शिक्षण देऊन विद्यार्थ्यांचे भवितव्य घडवणारी पेण एज्युकेशन सोसायटी शिक्षण संस्था सुपरिचित आहे. विद्यार्थ्यांना ज्ञान, पालकांचे समाधान आणि शिक्षकांना सन्मान देण्याचे कार्य संस्थेतर्फे होत असून हजारो विद्यार्थ्यांचे भवितव्य घडविण्याची दखल घेऊन आदर्श शैक्षणिक संस्था पुरस्कार प्रदान कण्यात येत असल्याचे मुख्य संपादक रवींद्र घोडविंदे यांनी सांगितले.

संस्थेला मिळालेला पुरस्कार संस्थेच्या प्रगतीकरिता काम करणारे संचालक मंडळ, शिक्षक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी पालक यांच्या कष्टाचे फळ असल्याचे मत अध्यक्ष मंगेश नेने यांनी व्यक्त केले. हा पुरस्कार मिळाल्याने जिल्हातील सर्व स्तरातून संस्थेचे कौतुक व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# 'सण, उत्सवात नियमांचे पालन करा'

**खोपोली : प्रतिनिधी**

कायदा, सुव्यवस्था राखणे हे प्रत्येक नागरिकांचे काम आहे. आपल्या चुकीमुळे कोणतेही प्रकार घडू नये यासाठी प्रत्येकाने सतर्क राहिले पाहिजे. सण साजरे करतांना कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी शासनाने दिलेल्या नियमांचे पालन करावे, असे आवाहन खालापूर पोलीस निरीक्षक बी. आर. कुंभार यांनी केले.

पोलीस पाटील, शांतता मोहल्ला कमिटी सदस्य, उत्सवाचे मंडळाचे आयोजक, अध्यक्ष यांची बैठक घेण्यात आली.

या वेळी ते म्हणाले की, महाशिवरात्र उत्सवाच्या वेळी महिला, मुलींची छेडछाड अवैध धंदे यांसारखे प्रकार होणार नाहीत, त्याचबरोबर सीसीटीव्ही कॅमेरे तसेच स्वयंसेवक नेमावे. छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी करतांना वाहतूक कोंडी, शिवाय छ. शिवाजी महाराज यांचे नवीन पुतळे बसवायचे असल्यास शासनाने दिलेल्या नियमांचे पालन करून बसवण्यात यावे, आदी सूचना देण्यात आल्या.

# माणगाव-निजामपूर मार्गावर अवजड वाहतूक

## वाहनाला ठोठावला ३९ हजाराचा दंड



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव-निजामपूर पुणे राज्यमार्गाचा रस्ता अरुंद असून या मार्गावर अनेक चढ-उतार व धोकादायक वळणे आहेत. त्यामुळे या मार्गावर क्षमतेपेक्षा जास्त भार असणाऱ्या अवजड वाहनामुळे लहान मोठ्या स्वरूपाचे अपघात सतत घडत आहेत. याबाबत मनसे दक्षिण जिल्हाध्यक्ष देवेंद्र गायकवाड व माणगाव तालुकाध्यक्ष प्रतिक रहाटे यांनी कारवाई करावी, अशी मागणी माणगाव पोलीस ठाण्यात होती. त्यांच्या तक्रारीची दखल घेत रायगड जिल्हा उपप्रादेशिक अधिकारी पेण यांनी या वाहनावर ३९ हजारांचा दंड ठोठावला आहे.

या मार्गावरून क्षमतेपेक्षा जास्त भार असलेल्या अवजड वाहने कॉईल घेऊन कोस्ते बुद्रुक येथील जेटीएल कंपनीकडे वाहतूक सुरू असते. त्यामुळे या मार्गावर वाहतूक कोंडीला नागरिकांना सामना करावा लागतो. नुकतेच माणगावहून जेटीएल कंपनीकडे कॉईल घेऊन निघालेला कंटेनर पाणोसे पुलाजवळील धोकादायक व तीव्र उतार असणाऱ्या वळणावर रॉंग साईडला बंद पडल्याने अन्य वाहनचालकांना नाहक त्रास सहन करावा लागत होता. याबाबत तक्रार मनसे पदाधिकाऱ्यांनी माणगाव पोलिसांकडे केली होती.

त्या तक्रारीनुसार पोलिसांनी हा कंटेनर ताब्यात घेऊन पेण उपप्रादेशिक अधिकाऱ्यांना अहवाल दिला होता. त्या अहवालानुसार पेण उपप्रादेशिक अधिकारी एम. एन. उचगावकर यांनी क्षमतेपेक्षा जास्त भार असल्याची या वाहनाची तपासणी करून ऑनलाईन ३९ हजार रुपये दंड ठोठावण्यात आला.

या दंडाची रक्कम ऑनलाईन जमा झाल्याची खात्री केल्यानंतर आरटीओ यांचे आदेशाने हे वाहन सोडण्यात आले.

# रायगड डाक विभागाचे सुकन्या समृद्धी अभियानात योगदान

## दोन दिवसांत दोन हजार १२४ मुलींची उघडली खाती

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड डाक विभागाकडून दोन दिवसांत दोन हजार १२४ मुलींच्या घरी संपर्क साधून सुकन्या समृद्धी अभियानात समृद्ध योगदान देण्यात आले.

या अभियानाची सुरुवात अलिबागची स्थानिक अभिनेत्री, डान्सर अंकिता राऊत आणि सात लहान बालिकांच्या हातून केक कापून करण्यात आला. हा कार्यक्रम अलिबाग पोस्ट ऑफिसच्या प्रांगणात झाला. घरोघरी संपर्क करून राबविलेल्या या अभियानातून रायगड डाक विभागाने ९ व १० फेब्रुवारी या दोन दिवसांत दोन हजार १२४ मुलींची सुकन्या समृद्धी खाती उघडली.



कर्मचारी वर्गाच्या सकारात्मक प्रतिसादाबद्दल जिल्हा डाक अधीक्षक डॉ.संजय लिये,सहायक अधीक्षक सुनील पवार, पोस्टमास्तर गजेंद्र भुसाणे यांनी अभिनंदन केले आहे.

# जिल्हा रुग्णालयात रुग्णाचे मरणोत्तर नेत्रदान

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

जिल्हा रुग्णालय येथे उपचारासाठी दाखल झालेल्या एका व्यक्तीने मरणोत्तर नेत्रदान केले. या नेत्रदानामुळे दोन गरजूंना दृष्टी मिळणार आहे.

आरोग्य सेवा मंडळ ठाणे उपसंचालक डॉ. हेमंत बोरसे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त शल्यचिकित्सक डॉ. प्रमोद गवई यांनी यशस्वी शस्त्रक्रिया केली.

मृत व्यक्तींच्या नातेवाईकांना समुपदेशक अक्षय गोरे यांनी भेटून नेत्रज्ञानाचे महत्त्व सांगितले. नातेवाईकांनी विचार करून नेत्रदानास तयारी दर्शविली. या कार्यात मालती मोकल, सरिता राऊत, निकिता नागावकर, पायल कदम, दर्शना म्हात्रे स्वाती मयेकर, हिराचंद्र म्हात्रे आदींचे सहकार्य लाभले.

# पेणमध्ये गजानन महाराज प्रकट दिन उत्साहात



**पेण : प्रतिनिधी**

गणी गण गणात बोते असा गजर करीत पेणमध्ये गजानन महाराज प्रकट दिन बांदीवडेकर बंधूंच्या वतीने साजरा करण्यात आला.

या वेळी माजी नगराध्यक्षा प्रितम पाटील यांनी मंदिरात जाऊन दर्शन घेतले. त्यांच्यासोबत माजी उपनगराध्यक्षा वैशाली कडू, ललित पाटील, माजी नगरसेविका शहेनाज मुजावर, माजी नगरसेवक अजय क्षिरसागर, भाजप महिला शहर अध्यक्षा सुप्रिया चव्हाण उपस्थित होते. बांदिवडेकर कुटुंबीयांच्या वतीने प्रितम पाटील यांचे स्वागत करण्यात आले. मंदार बांदिवडेकर, राजेंद्र बांदिवडेकर, धर्मेंद्र बांदिवडेकर, महेंद्र बांदिवडेकर, राहुल पाटील आदी सदस्य उपस्थित होते.

# टीम इंडियाने रचला इतिहास!

## क्रिकेटच्या तिन्ही प्रकारांत अव्वल स्थानी झेप

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियाविरुद्ध सुरू असलेल्या बॉर्डर-गावसकर ट्रॉफीतील पहिल्या कसोटीनंतर भारतीय क्रिकेट संघाने इतिहास घडविला आहे. आयसीसीद्वारे बुधवारी (दि. १५) जाहीर करण्यात आलेल्या ताज्या क्रमवारीत टीम इंडिया कसोटीत अव्वल स्थानी पोहचली आहे. सध्या भारतीय संघ टी-२० आणि वनडेतदेखील अव्वल स्थानी आहे. आता कसोटीमुळे भारत तिनही फॉर्मेटमध्ये अव्वल स्थानी पोहचला आहे.



भारतीय क्रिकेटच्या इतिहासात असे प्रथमच घडले आहे की संघ एकाच वेळी आयसीसीच्या तिनही क्रमवारीत अव्वल स्थानी पोहचला आहे. कर्णधार रोहित शर्मा आणि हार्दिक पांड्याच्या नेतृत्वाखाली भारताने हा नवा इतिहास रचला आहे. सध्या रोहित शर्मा वनडे आणि कसोटीचे तर हार्दिक टी-२०मध्ये नेतृत्व करतोय.

कसोटी मालिका सुरू होण्याआधी भारतीय संघ वनडे आणि टी-२०मध्ये अव्वल स्थानी होता. नागपूर कसोटीत टीम इंडियाने ऑस्ट्रेलियावर डाव आणि १३२ धावांनी दणदणीत विजय मिळवला आणि कसोटीतदेखील अव्वल स्थान मिळविले. कसोटीत आता भारताचे ११५ गुण आहेत, तर दुसऱ्या क्रमांकावर ऑस्ट्रेलिया असून त्यांचे १११ गुण आहेत.

### सर्व मालिका जिंकल्या

भारतीय संघाने २०२३मध्ये आतापर्यंत एकही मालिका गमावलेली नाही. भारताने प्रथम श्रीलंकेविरुद्ध वनडे आणि टी-२० मालिका जिंकली. त्यानंतर न्यूझीलंडसोबतची मालिका जिंकली तसेच नुकत्याच झालेल्या भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील पहिला कसोटी सामना तीन दिवसांत संपवत सामना खिशात टाकला. उभय संघांत दुसरा कसोटी सामना १९ फेब्रुवारीपासून दिल्लीत होणार आहे.

# क्रिकेटपटू फिटनेससाठी इंजेक्शन घेतात?

## निवड समितीचे अध्यक्ष चेतन शर्मांचा धक्कादायक खुलासा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

### स्टिंग ऑपरेशनमुळे खळबळ

गेल्या काही वर्षांत भारतीय क्रिकेट संघाचा आलेख उंचावत असताना बीसीसीआयच्या निवड समितीचे अध्यक्ष चेतन शर्मा यांनी धक्कादायक खुलासे केले आहेत. टीम इंडिया डोपिंगच्या (उत्साहवर्धक इंजेक्शन) विळख्यात अडकली असून अनेक खेळाडू स्वतःला फीट ठेवण्यासाठी इंजेक्शन घेतात. ही बाब बीसीसीआयला माहीत असूनही क्रिकेट बोर्डाकडून याकडे कानाडोळा केला जातो, असे शर्मा यांनी म्हटले आहे.

'झी न्यूज'ने छुप्या कॅमेऱ्याच्या मदतीने चेतन शर्मा यांचे स्टिंग ऑपरेशन केले आहे. यात शर्मा यांनी भारतीय क्रिकेट संघात स्थान मिळविण्यासाठी क्रिकेटर्स कशा पद्धतीने निवड समितीला खूश ठेवतात याबाबतही खुलासा केला आहे. शिवाय विराट कोहली आणि



बीसीसीआयचे माजी अध्यक्ष सौरभ गांगुली यांच्यातील वादावरही शर्मा यांनी भाष्य केले आहे. गांगुलीमुळेच विराटला कर्णधारपद सोडावे लागले, असे शर्मा यांनी सांगितले.

भारताचा जलदगती गोलंदाज जसप्रीत बुमराहचे सप्टेंबरमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या टी-२० मालिकेतून पुनरागमन करण्यावरून संघ व्यवस्थापनाशी मतभेद होते. बुमराहला अजूनही संघात संधी मिळालेली नाही, असाही दावा शर्मा यांनी केला आहे.

### बीसीसीआय करणार चौकशी

निवड समितीचे अध्यक्ष चेतन शर्मा यांनी स्टिंग ऑपरेशनमध्ये भारतीय क्रिकेटबाबत केलेल्या खुलाशानंतर बीसीसीआयने या प्रकरणाची चौकशी करण्याचा निर्णय घेतला आहे. बीसीसीआयने अलीकडेच शर्मा यांना दुसऱ्यांदा निवड समितीचे अध्यक्ष केले. यापूर्वी ऑस्ट्रेलियात खेळल्या गेलेल्या टी-२० विश्वचषकात भारतीय संघाच्या खराब कामगिरीनंतर त्याला हटविण्यात आले होते. बीसीसीआय हे प्रकरण गांभीर्याने घेत असून आता मुख्य निवडकर्ता शर्मा यांच्यावर कारवाई करण्याच्या तयारीत आहे.

# अलिबागमध्ये शनिवारी पत्रकारांची क्रिकेट स्पर्धा



**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग प्रेस असोसिएशनच्या वतीने येत्या शनिवारी (दि. १८) रायगड जिल्ह्यातील पत्रकारांची क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. ही पत्रकार चषक क्रिकेट स्पर्धा अलिबागमधील जिल्हा क्रीडा संकुल नेहुली येथे खेळविण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील पत्रकारांची पत्रकार चषक क्रिकेट स्पर्धा आयोजित केले जात असते. कोरोना प्रादुर्भावामुळे गेली काही वर्षे ही स्पर्धा होऊ शकली नव्हती. यंदा अलिबाग येथे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत सर्व तालुक्यातील पत्रकारांचे संघ सहभागी होणार आहेत. पोलीस विरुद्ध महसूल विभाग, सर्वपक्षीय राजकीय नेते विरुद्ध अलिबाग पत्रकार असे दोन प्रदर्शनीय सामनेदेखील या स्पर्धेनिमित्ताने खेळविले जाणार आहेत.

स्पर्धेतील विजेता संघ, उपविजेता संघ, तृतीय क्रमांक व चतुर्थ क्रमांक मिळविणाऱ्या संघांना भव्य चषक आणि रोख रकमेचे बक्षीस देण्यात येणार आहे. याशिवाय शिस्तबद्ध संघ, आकर्षक गणवेश यासाठी चषक देण्यात येणार आहे. स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू, सर्वोत्कृष्ट फलंदाज, सर्वोत्कृष्ट गोलंदाज अशी वैयक्तिक बक्षिसेही दिली जाणार आहेत. प्रत्येक सामन्यातील समानावीरास चषक बक्षीस देण्यात येणार आहे, अशी माहीती अलिबाग प्रेस असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश सोनवडेकर यांनी दिली.

# शतकी कसोटीपूर्वी पुजाराने घेतली पंतप्रधानांची भेट



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात येत्या शुक्रवार (दि. १७)पासून दिल्लीत दुसरी कसोटी खेळली जाणार आहे. कसोटी विशेषज्ञ चेतेश्वर पुजारासाठी हा सामना खूप खास आहे. ही त्याची १००वी कसोटी असेल आणि या विक्रमाला स्पर्श करण्यापूर्वी त्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली आहे.

या बैठकीची छायाचित्रेही बीसीसीआयने शेअर केली आहेत. विशेष सामन्यापूर्वी पंतप्रधान मोदींनी पुजाराला शुभेच्छाही दिल्या. या भेटीत क्रिकेटपटूची पत्नी पूजाही त्याच्यासोबत होती.

३५ वर्षीय पुजाराने ट्विट केले की, आमचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांना भेटणे हा एक सन्मान होता. माझ्या १००व्या कसोटीपूर्वी मी तुमच्याकडून मिळालेल्या प्रोत्साहनासाठी आभारी आहे. धन्यवाद पीएमओ इंडिया! ट्विटला उत्तर देताना पंतप्रधान मोदींनी लिहिले, आज पूजा आणि तुला भेटून आनंद झाला. तुझ्या १००व्या कसोटीसाठी आणि तुझ्या कारकिर्दीसाठी खूप खूप शुभेच्छा!

# पनवेलचा अनुज भोसले राष्ट्रीय थाई-बॉक्सिंग प्रोफेशनल बेल्ट विजेता

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आसाममधील गुवाहाटी येथे नवव्या राष्ट्रीय थाई-बॉक्सिंग फेडरेशन कप स्पर्धेमध्ये प्रोफेशनल टायटल बेल्ट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये +७० किलो वजनी गटात पनवेलच्या अनुज संजय भोसले याने विजेतेपद पटकावून प्रोफेशनल टायटल बेल्ट पटकाविला. त्याचे कौतुक होत आहे.


अनुज भोसले हा युनायटेड शोतोकान कराटे असोसिएशन इंडियाचे शिहान निलेश किसन भोसले (५ डिग्री ब्लॅक बेल्ट) यांच्याकडे कराटे आणि इतर



मार्शल आर्टस्चे प्रशिक्षण घेत आहेत. युनायटेड शोतोकान कराटे असोसिएशन इंडियाचे अध्यक्ष आणि थाईबॉक्सिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे चेअरमन डॉ. मंदार पनवेलकर, महाराष्ट्र थाईबॉक्सिंग अध्यक्ष फरहान नबीजी, सचिव सागर कोळी, पनवेल शहर सचिव प्रतिक कारंडे यांनी अनुजचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# सानिया मिर्झाची नवी इनिंग

## 'आरसीबी'ची मार्गदर्शक म्हणून नियुक्ती



**बंगळुरू : वृत्तसंस्था**

भारतीय टेनिस स्टार सानिया मिर्झाची महिला प्रीमियर लीगमधील रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाची मार्गदर्शक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. आरसीबीने आपल्या अधिकृत ट्विटर हँडलवरून याची पुष्टी केली.

आरसीबीच्या ट्विटर हँडलवर असे लिहिले आहे की, महिलांसाठी भारतीय खेळातील एक अग्रणी, युवा आयकॉन जी तिच्या संपूर्ण कारकिर्दीत निर्भयपणे खेळली आणि प्रतिकूल परिस्थितीला तोंड दिले. मैदानावर आणि मैदानाबाहेर चॅम्पियन आम्हाला तुझा अभिमान वाटतो, असा उल्लेख करीत आरसीबीने महिला क्रिकेट संघाची मार्गदर्शक म्हणून सानिया मिर्झाचे स्वागत केले.


यावर टेनिसपटू सानिया म्हणाली की, तिला क्रिकेट संघाचा मार्गदर्शक बनण्याची ऑफर मिळाल्याचे कळातच खूप आश्चर्य वाटले होते, पण नंतर तिने ते स्वीकारले.

# कामोठ्यातील मोनिका घाग कुमिते 1 वॉरियर हंटची विजेती

**पनवेल : वार्ताहर**

कामोठे येथील रहिवासी मोनिका किरण घाग ही भारताच्या पहिल्यावाहिल्या मिक्स मार्शल आर्ट (एमएमए)वर आधारित रियॅलिटी शो कुमिते १ वॉरियर हंटची विजेती ठरली आहे. मोनिकाला तीन वर्षांच्या करारासह पाच हजार डॉलरचे रोख बक्षीस अभिनेता सुनील शेट्टी यांच्या हस्ते देण्यात आले तसेच तिला आता जागतिक स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार आहे.

मोनिका घाग ही रायगड जिल्ह्याला महाराष्ट्र केसरी महिला कुस्ती स्पर्धेत वैयक्तिक पदक मिळवून देणारी पहिली महिला असून तिने दोन वेळा राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले आहे. त्याचप्रमाणे वुशू या खेळामध्ये तिने राज्यस्तरावर रायगडला सुवर्णपदक मिळवून दिले आहे तसेच साऊथ एशियान ब्राझिलियन जिउजित्सू स्पर्धेत भारताचे



प्रतिनिधित्व करून सुवर्णपदक जिंकले आहे.


मोनिकाने एमएक्स प्लेयर या प्रसिद्ध ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रक्षेपित झालेल्या एमएमए रियॅलिटी शो कुमिते १ वॉरियर हंट सिझन १चा टायटल बेल्ट पटकाविला. त्यामुळे ती आता संयुक्त अरब अमिराती (यूएई)मध्ये होणाऱ्या के-१ आशियाई चॅम्पियनशिपमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करेल. या शोच्या प्रमोशनसाठी इंडियन डब्ल्यूडब्ल्यूएफ सुपर स्टार द ग्रेट खली, महावीर फोगाट आणि त्यांची सुकन्या रितू फोगाटही उपस्थित होते.

# फिट रत्नागिरी हॅप्पी मॅरेथॉन

**रत्नागिरी : प्रतिनिधी**

राज्याचे उद्योगमंत्री तथा रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत आणि जिल्हा प्रशासन यांच्या वतीने येत्या रविवारी (दि. १९) फिट रत्नागिरी हॅप्पी मॅरेथॉन २०२३ या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. रत्नागिरीमधील छत्रपती शिवाजी स्टेडियम येथून या स्पर्धेस प्रारंभ होणार आहे.

स्पर्धा एकूण १० गटांत होणार असून यामध्ये १४ वर्षाखालील मुले व मुली, १८ वर्षाखालील मुले व मुली आणि पुरुष, महिला असे गट असून ५ किमी, १० किमी आणि २१ किमी अशा अंतराची ही स्पर्धा आहे. १४ व १८ वर्षाखालील मुले व मुली गटासाठी ५ किमी



अंतर असून पुरुष व महिला गटातील धावपटू ५ किमी, १० किमी किंवा २१ किमी या एका स्पर्धेत सहभागी होऊ शकतात.

स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व धावपटूना टी-शर्ट, सहभाग प्रमाणपत्र तसेच प्रथम तीन क्रमांक विजेत्यांना रोख रक्कम, प्राविण्य प्रमाणपत्र व पदक देण्यात येणार आहे.

या स्पर्धेत जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन पालकमंत्री उदय सामंत व जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# कबड्डी असोसिएशन अध्यक्षपदी अनंता हिरवे

**खोपोली : प्रतिनिधी**

कर्जत खालापूर, पनवेल तालुका धनगर समाज कबड्डी असोसिएशनच्या अध्यक्षपदी अनंता हिरवे, तर उपाध्यक्षपदी ठकुराम झोरे यांची निवड करण्यात आली आहे.



धनगर समाज क्रीडा क्षेत्रातही मोठ्या प्रमाणात अग्रेसर असून समाजात उत्कृष्ट खेळाडू तयार करून जिल्हा, महाराष्ट्र आणि देशपातळीवर पाठविण्याचा संकल्प समाजाने केला आहे. यासाठी समाजाचे ज्येष्ठ नेते तथा हर हर चांगभले धनगर समाज संस्थेचे सचिव अनंता हिरवे यांनी युवकांना एकत्र करीत कबड्डी असोसिएशनची स्थापना केली आहे, जेणेकरून कर्जत, खालापूर आणि पनवेल तालुक्यात धनगर समाजात उत्कृष्ट खेळाडू तयार व्हावेत. ही बैठक खैराट येथे झाली. यात असोसिएशनच्या अध्यक्षपदी हिरवे यांची व उपाध्यक्षपदी ठकुराम झोरे यांची निवड करण्यात आली. त्यांचे अभिनंदन होत आहे.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com